DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021



ठाणेवैभव
अधिक बातम्यांसाठी आमच्या वेबसाइटला भेट द्या
www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

www.thanevaibhav.in

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

भारतीय सौर दिनांक कार्तिक ३ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक ५९ | सोमवार २५ ऑक्टोबर २०२१ | पाने ६ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ



विचारांचे वैभव
विशेष
>>पान ५ वर

## या 'पार्टी'त आता दारु नाही!

ती बातमी वाचून न पिणाऱ्या बारमालकाची नशा खाडकन् उतरावी तसा प्रकार झाला. देशातील एका प्रमुख राजकीय पक्षाने आपल्या सदस्यांकडून दारु न पिण्याची हमी घेण्याचे ठरवल्याची बातमी बारमालकाने वाचली होती. एकेकाळी गरिबी हटावाची गर्जना करणाऱ्या पक्षाने दारुहटावचा नारा का द्यावा हे बारमालकास समजत नव्हते. त्याने वर्तमानपत्र बाजूला ठेऊन आपल्या संघटनेच्या अध्यक्षांना फोन लावला.





मिलिन्द बल्लाळ

- अण्णा, आपने आजका पेपर पडा क्या?
- पडा. बारका रातका टाईम बडाया है, वहीच ना?
- नही अण्णा वो खबर जुना हो गएला है. ये ताजा खबर पडेगा तो तुम्हारा भी होश उड जाएगा!
-ऐसा क्या बोलता तू सुदेश अण्णा? सुबू सुबू पिके बोल रहा क्या?
- मैं नहीं पिता अण्णा.थांबा, तुमको मैच वाचून दाखवतो. ऑल इण्डिया लेव्हलकी ये पार्टीने वर्करलोक के वास्ते नवीन नियमावली बनवली आहे. त्यातली पहिल्या अटमुळे आपल्याला बारला टाळा मारुन बोराबिस्तरा बांधून गावाला जायला लावणार आहे.
- सुदेशअण्णा. खबर पक्का है क्या? आजकल पेपरवाला कुछ भी छापता है, इसलिए डाऊट आया.
-पक्की खबर आहे. लिहिणारा माणूस प्रेस कॉन्फरन्स गेला तर ग्रीन टी शिवाय काही पीत नाही, असे मला समजले आहे.
-तरी तू पक्षातील प्रमुख नेत्यांकडे कन्फर्म केलेले बरे.
- ते पण केले ज्याला फोन केला तो तर पुढचे दोन दिवस घरातला पूर्ण स्टॉक संपवण्यासाठी बसला होता.
- अरे काय बोलतो सुदेश अण्णा, ही बातमी खरंच डेंजर आहे.
- डेंजर नाही अण्णा. महाडेंजर आहे. अरे एका मोठ्या पक्षाने असा निर्णय घेतला तर बाकीचे पक्षही त्याची कॉपी मारतील. मग तर धंदा चोपट झालाच समज.
- अण्णा, तुम्ही तातडीची मिटिंग बोलवा. आपल्याला या पक्षाच्या प्रमुख नेत्यांना भेटून हा नियम रद्द करून घ्यावाच लागेल.
- ते करु रे. पण या पक्षाच्या नेत्यांना दारुचे फक्त तोटेच कसे दिसतात?
- अण्णा, वहीच मै बोलतोय. आपण फायदे समजावून सांगितले पाहिजे.
- तू बोलत जा. मी लिहून घेतो. आपण लेटर लिहू.
- फायदा नं.1. दारूमुळे माणूस खरा बोलतो. सतत खोटे बोलणाऱ्या नेत्यांना खरं बोलण्याची सवयच राहणार नाही.
- याने की झूठ. झूठके सिवाय कुछ नही. पुढे बोल.
- दारू पिणे आणि पाजणे यावर देशाची अर्थव्यवस्था अवलंबून असते. ती पिण्यास विरोध केला आणि तेही आपल्या राजकीय ग्राहकांना, तर आपलीच नाही तर देशाची अर्थव्यवस्था कोलमडून जाईल.
- सुदेशअण्णा. मस्त पॉईंट आहे. पुढे बोल.
- दारु पिऊन जनतेला आश्वासन दिलं आणि ते पाळलं नाही तर मनाला कमी ठेच लागते, हे आपल्या कोमलहृदयी नेत्यांना सांगावे लागेल. प्रचार सभेत भाषणापूर्वी किंवा जाहीरनामा बनवताना पेगभर दारु पोटात गेल्याने खोटं बोलण्याचं दुःख सहन होत असते.
- हं. आगे बोलो.

>>पान २ वर

## आघाडीसाठी प्रयत्नशील पण लशींचे राजकारण अयोग्य

### जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांचा शिवसेनेला टोला



"एकमेकांचे बॅनर फाडून लोकांच्या मनातील स्थान कमी होत नाही. केंद्राकडून आलेल्या लसीचे श्रेय घेण्याचा प्रयत्न कोणी करु नये. महापौरांना आनंद परांजपे यांची लवकरच ओळख पटेल, असे जयंत पाटील म्हणाले.

**ठाणे: आमचे पहिले प्राधान्य हे महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढविण्याला असेल. मात्र, स्थानिक गणिते जुळणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रयत्न केला जाईल. तिन्ही पक्ष सरकारमध्ये आहेत. त्यामुळे सर्व शहरांमध्येही आघाडी असावी, असा आमचा प्रयत्न असणार आहे, असे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी सांगितले.**

राष्ट्रवादी परिवार संवाद यात्रेच्या निमित्ताने जयंत पाटील हे ठाण्यात आले होते. त्यावेळी

>>पान २ वर

## इमारतीचा स्लॅब कोसळून तरुणाचा मृत्यू



**उल्हासनगर: काही महिन्यांपूर्वी मोहिनी पॅलेस या इमारतीचे स्लॅब कोसळून पाच जणांचा तर , साई शक्ती इमारतीचा स्लॅब कोसळून सात जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर काल रात्री पुन्हा एकदा पारस अपार्टमेंट या इमारतीचा स्लॅब कोसळला आहे. त्यात एका तरुणाचा मृत्यू झाला आहे.**

काल रात्री कॅम्प नंबर 5 मध्ये असलेल्या आणि धोकादायक इमारतींच्या यादीत नसलेल्या पारस अपार्टमेंट या इमारतीचा 5 व्या मजल्याचा स्लॅब तिसऱ्या मजल्यावर कोसळला. त्यात आकाश उर्फ राजा पोपटानी हा 25 वर्षीय तरुण दगावला आहे.

ही घटना समजताच आयुक्त महापौर लिलाबाई आशान, शिवसेना नगरसेवक अरुण आशान, डॉ.राजा दयानिधी, मुख्यालय उपआयुक्त अशोक नाईकवाडे, महेंद्र पंजाबी, अग्निशमन दलाचे अधिकारी बाळू नेटके, युटीए व्यापारी असोसिएशनचे कॅम्प नंबर 5 चे अध्यक्ष व परिवहन समिती सभापती दिनेश लहरानी आदींनी धाव घेऊन बचावकार्य सुरु केले असून रहिवाशांना बाहेर काढले आहे

मध्यरात्रीपर्यंत घटनास्थळी असलेल्या पालिकेच्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण इमारत खाली केली अशी माहिती मुख्यालय उपआयुक्त अशोक नाईकवाडे यांनी दिली.





**दीड ते पावणे दोन वर्षांनंतर नाट्यगृहाचे पडदे उघडले. ठाण्यात दुरुस्तीमुळे गडकरी रंगायतनमध्ये तिसरी घंटा वाजली नसली तरी महापालिकेच्या काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात गुरुकुल प्रतिष्ठानच्या वतीने बासरी वादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रसिक ठाणेकर मंत्रमुग्ध होत काही काळ तणावातून बाहेर पडलेले दिसले.**

## पालिका निवडणुकीतील आघाडीला लसीकरणाच्या वादाचा सुरुंग

**ठाणे: राज्यात महाविकास आघाडीची सत्ता असली तरी मागील काही दिवसांपासून सुरु असलेल्या राष्ट्रवादी आणि शिवसेनेमधील लसीकरण मोहिमेच्या वादावरून आगामी ठाणे महापालिका निवडणुकीत आघाडीत बिघाडी होण्याची दाट शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत कॉंग्रेसने यापूर्वीच 'एकाला चलो'ची भूमिका जाहीर केली आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेनेची आघाडी ठाण्यात होईल, अशी कार्यकर्त्यांना अपेक्षा होती, परंतु लसीकरण मोहिमेच्या वादाची ठिणगी पडल्याने आघाडी होणार नसल्याचे बोलले जात होते. त्यातच कळवा येथे लसीकरण करण्यासाठी लावण्यात आलेले गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांचे बॅनर शिवसेनेच्या नगरसेवकाने फाडले

>>पान २ वर

**महापालिकेत सध्या शिवसेनेकडे 67 नगरसेवक आहेत. राष्ट्रवादी पक्षाकडे 34चे संख्याबळ आहे तर कॉंग्रेसकडे तीन नगरसेवक आहेत. राष्ट्रवादी पक्षाबरोबर आघाडी केली तर त्यांना जास्त जागा सोडाव्या लागणार आहेत. ते सेनेला परवडणारे नाही. आघाडी केली तर बंडखोरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचबरोबर सेनेचे तिकीट मिळाले नाही तर अनेकजण मनसे आणि भाजपची वाट धरतील. हा धोका लक्षात घेऊन सेनेचे नेते निवडणुकीत जोखीम घेणार नाहीत. त्यामुळेच ठाण्यात आघाडी होण्याची शक्यता नाही असे काही राजकीय तज्ज्ञांचे मत आहे.**

## जिल्ह्यात ८० लाख नागरिकांना दिली लस

**ठाणे: कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेत ठाणे जिल्ह्यात आतापर्यंत 80 लाख नागरिकांना लस देण्यात आली असून कोविन पोर्टलवरील नोंदीनुसार आज रात्री आठपर्यंत 10 हजार 298 नागरिकांचे लसीकरण करण्यात आले.**

जिल्ह्यात आतापर्यंत एकूण 80 लाख 6 हजार 613 नागरिकांचे लसीकरण करण्यात आले असून त्यापैकी 53 लाख 76 हजार 179 नागरिकांना पहिल्या डोसचे तर 26 लाख 30 हजार 434 नागरिकांना दुसरा डोस देण्यात आला आहे. आज दिवसभरात लसीकरणाचे सुमारे 172 सत्र आयोजित करण्यात आले.

## पाच वर्षात रस्ते दुरुस्तीसाठी दीड हजार कोटींचा खर्च

**ठाणे : गेल्या पाच वर्षात ठाणे महापालिकेने रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तब्बल दीड हजार कोटी रुपये खर्च केले आहेत. मात्र ठाणेकरांच्या नशिबी खड्डेच येत असून कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.**

ठाणे शहरात एकूण 280 किलोमीटरचे रस्ते आहेत. यामध्ये इतर प्राधिकरणाचे देखील रस्ते आहेत. गेल्या पाच वर्षांमध्ये या रस्त्यांवर पालिकेने दीड हजार कोटी खर्च केला असून या रस्त्यांमध्ये डांबरी रस्ते,

>>पान २ वर




## पोलिसांच्या कर्तव्य तत्परतेमुळे बेपत्ता बालके सुखरूप



**डोंबिवली: आईपासून दुरावलेल्या मुलांना शोधण्यात मानपाडा पोलिसांनी यश मिळविले आहे. विशेष म्हणजे ही दोन्ही मुले बेपत्ता झाल्याची नोंद होण्यापूर्वीच अवघ्या काही तासांतच त्यांना शोधून काढणाऱ्या पोलिसांचे कौतुक करण्यात येत आहे.**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, देसलेपाड्यात रहात असलेली चुडामणी कृष्णा सोनार (40) ही महिला घरकाम करते. रविवारी सकाळी 6 वाजता चुडामणी नेहमीप्रमाणे घरकाम करण्यास बाहेर गेली. जाताना तिने दुर्गा (4) आणि गणेश (2) ही दोन्ही मुले मानपाडा रोडला सागांवमध्ये राहणाऱ्या पुजाबाई चौहाण या बहिणीच्या घरी ठेवली होती. पुजाबाई घरत झोपली तेव्हा तिने दाराला आतून कडी लावली होती. 10 वाजता जेव्हा जाग आली तेव्हा तिला घराचा दरवाजा उघडा दिसला. दोन्ही मुले घरात नसल्याने तिने आजुबाजुच्या परिसरात मुलांचा सर्वत्र शोध घेतला. मात्र मुले कुठेही आढळून न आल्याने पुजाबाई आणि चुडामणी या दोघा बहिणींनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तत्काळ बीट मार्शल व गुन्हे प्रकटीकरण पथकाला आपल्या हद्दीसह बाजारपेठ, रिक्षा स्टॅन्ड, मोकळी मैदाने, आदी ठिकाणी मुलांचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. पोलिसांच्या पथकांनी सागांवकडून डोंबिवली स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्याला शोध सुरु केला. डोंबिवली

>>पान २ वर



## ठाण्यातील आठ प्रभागांत एक आकडी रुग्ण

**ठाणे: शहरातील कोरोना रुग्णांची संख्या कमी होत असून आज 47 नवीन रुग्णांची भर पडली तर तब्बल 95जण कोरोनामुक्त झाले आहेत. सुदैवाने एकही व्यक्ती दगावली नसून आठ प्रभागात एक आकडी रुग्ण सापडले आहेत.**

महापालिका हद्दीतील कोरोना रुग्णांचा आलेख कमी होत चालला आहे. सर्वात जास्त 21 रुग्ण माजिवडे-मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रात सापडले आहेत. सात रुग्ण उथळसर आणि सहा रुग्ण वर्तकनगर प्रभाग समिती भागात वाढले आहेत. मागील काही महिने रुग्णसंख्या तळाशी असलेल्या मुंब्रा येथे चार रुग्णांची भर पडली आहे. तीन रुग्ण लोकमान्य-सावरकरनगर प्रभाग समिती येथे मिळून आले आहेत. नौपाडा-कोपरी प्रभाग समिती परिसरात दोन रुग्णांची नोंद झाली आहे तर सर्वात कमी प्रत्येकी एक रुग्ण दिवा, वागळे आणि कळवा प्रभाग समितीमध्ये नोंदवले गेले आहेत.

विविध रुग्णालयात आणि घरी उपचार घेत असलेल्या रुग्णांपैकी 95जणांनी कोरोनावर मात केली आहे. आत्तापर्यंत एक लाख 38 हजार 53 रुग्ण ठणठणीत बरे होऊन घरी गेले आहेत तर रुग्णालयात आणि घरी 482 जणांवर उपचार सुरु आहेत. सुदैवाने आज एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नसून आत्तापर्यंत दोन हजार 96जण दगावले आहेत.

महापालिका प्रशासनाने काल शहरातील दोन हजार

>>पान २ वर

# राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्षांनी भरवला पदाधिकाऱ्यांचा वर्ग




**अंबरनाथ: किती वर्षांपासून पक्षाचे पदाधिकारी आहात, पक्षवाढीसाठी काय प्रयत्न केले, पक्षाचे चिन्ह असलेल्या घड्याळाप्रमाणे गंभीरपणे वेळेत पक्षासाठी कार्य करा, अनेक वर्षांपासून त्याच जागांवर असलेल्या पदाधिकाऱ्यांना प्रमोशन द्या असे एक ना अनेक प्रश्न विचारून राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी एखाद्या शिक्षकाच्या भूमिकेत पदाधिकाऱ्यांना प्रश्न विचारून त्यांची मते जाणून घेतली.**

अंबरनाथ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शनिवारी परिवार संवाद यात्रेच्या दरम्यान अंबरनाथला शहराध्यक्ष सदाशिव पाटील यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष पाटील यांच्यासह गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, कार्याध्यक्ष सूरज चव्हाण, जिल्हाध्यक्ष दशरथ तिवरे आदींनी अंबरनाथमधील राष्ट्रवादीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

स्थानिक पातळीवर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मजबूत संघटना तयार करून नागरिकांशी संपर्क साधून त्यांच्याशी संवाद साधा. कोणत्याही प्रकारच्या निवडणुकीसाठी यंत्रणा कमी पडू नये यासाठी आतापासूनच तयारीला लागा, राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार असून पक्षवाढीसाठी सत्तेचा योग्य वापर करावा, अंबरनाथ नगरपालिकेत राष्ट्रवादीचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून कसे येतील याकडेही लक्ष द्या, असा सल्ला प्रदेशाध्यक्ष पाटील यांनी दिला.

सर्व प्रकारची समीकरणे लक्षात घेऊन निवडणुका जिंकण्याची गणिते आखावीत, भाजपाला प्रत्येक पातळीवर अपयश आल्याने त्याचा फायदा घेत नागरिकांच्या जीवनाशी भिडणाऱ्या समस्यांवर आंदोलने करा, गांभीर्याने कामे करा, निवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरावे लागेल, असे प्रतिपादन गृहनिर्माण मंत्री आव्हाड यांनी केले.

पक्षात पद घेतले तर काम करावे लागेल, संघटना वाढली तर पक्ष वाढेल. जबाबदार कार्यकर्त्यांना जबाबदारी सोपवा, तरच निवडणुकीत निभाव लागेल आणि नगरपालिका निवडणुकीत घवघवीत यश मिळवणे शक्य असल्याचे युवक प्रदेशाध्यक्ष शेख आणि कार्याध्यक्ष सूरज चव्हाण म्हणाले. शहराध्यक्ष सदाशिव पाटील, प्रदेश सरचिटणीस महेश तपासे, प्रमोद हिंदुराव, किसनराव तारमळे, कमलाकर सूर्यवंशी, पुष्पराज गायकवाड, साबे काका, शहर महिलाध्यक्षा पूनम शेलार आदींची यावेळी भाषणे झाली. शहर सरचिटणीस धनंजय सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले.

# सॅटिसला अडथळा ठरणाऱ्या स्कायवॉकच्या भागाच्या पाडकामाला सुरुवात



**कल्याण : कल्याण रेल्वे स्टेशन पश्चिमेतील स्मार्ट सिटी सॅटिस प्रकल्पांतर्गत स्टेशन परिसरात फ्लायओव्हर बांधून बस स्थानकांचा कायापालट करीत पार्किंग सुविधा, व्यापारी संकुल, वाहनतळ, सुविधा सह स्टेशन परिसराचा कायापालट होणार आहे. या कामाला अडथळा ठरणारा स्कायवॉक चे तीन ठिकाणी क्रॉसिंगचे भाग पडण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे.**

सन 2008 ते 2010 या कालावधीत एमएमआरडीएच्या माध्यमातून कल्याण स्टेशन परिसरात कल्याण स्टेशन ते दिपक हॉटेल, कल्याण स्टेशन ते कल्याण तहसीलदार कार्यालय रस्ता तसेच कल्याण स्टेशन ते गुरुदेव हॉटेल, कल्याण स्टेशन ते साधना हॉटेल परिसरात स्टेशन परिसर सुधारणा अंतर्गत सिमेंट रस्त्यासह स्कायवॉक नागरिकांच्या सुविधेसाठी बांधला.

वाढते शहरीकरण पाहता कल्याण स्टेशन परिसरात होणारी वाहतूक कोंडी, वाहनांची वर्दळ पाहता स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत कल्याण स्टेशन परिसराचा कायापालट करण्यासाठी सुमारे 490 करोड खर्चाचा सॅटिस प्रकल्पानुसार कल्याण स्टेशन परिसरात अद्यावत पार्किंग, स्टेशनमधून बाहेर पडणाऱ्या प्रवाशांसाठी रिक्षा तळ, स्टेशनलगत असणाऱ्या एसटी स्थानकांचा कायापालट स्कायवॉकवरुन जाणारा फ्लायओव्हर ब्रीज तसेच बसेस, रिक्षांसाठी वेगेळी मार्गिका, बस स्थानकात प्रवाशांना उतरण्यासाठी लीफ्ट, सरकते जिने अशा सुविधा मिळणाऱ्या भव्य सॅटिस प्रकल्पाच्या कामासाठी अढथळा ठरणारे स्कायवॉकच्या तीन ठिकाणच्या क्रॉसिंगचा भाग काढण्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली असून येत्या दोन वर्षात सॅटिस प्रकल्पांतर्गत कल्याण स्टेशनचा कायापालट होईल, असे स्मार्ट सिटी प्रकल्प आधिकारी तरुण जुनेजा यांनी सांगितले.

पान १ वरुन

# या 'पार्टी'त आता दारु नाही!

- दारु पिता-पिता बरेच खाद्यपदार्थ तोंडी लावायला लागतात. ती फार मोठी इण्डस्ट्री आहे. पण दारु पिण्यावरच बंदी आणली तर देशाच्या औद्योगिकीकरणावर भयंकर परिणाम होईल.
- सुदेश अण्णा. तू बहोत स्मार्ट है. इण्डस्ट्री बंद तो बेकारी बडेगा.
- हो ना. अण्णा. बार बंद झाले तर आपले नेते ठेकेदारांना कुठे भेटतील? देवाण-घेवाणीचे ठरले नाही तर विकासच थांबेल. हा तोटा लक्षात आणून द्यावा लागेल.
-बोले तो डेव्हलपमेंट के लिए दारु पिनीच चाहिए! आगे बोल सुदेश अण्णा.
-अण्णा सच बोलू, दारुकीवजह समाजमें खुशियाली होती है
- वो कैसे?
- लोग एक दुसरेके साथ दोस्ती करते है. उनमें प्रेम बढता है. एकमेकांबद्दलचे गैरसमज दूर होऊ शकतात. दारु नसेल तर डोकं चालत नाही, आणि डोकं चाललं नाही तर प्लॅनिंग होऊ शकत नाही.
-यह भी सच है. पण तरी आपले त्या पक्षाच्या नेत्याने ऐकलेच नाही तर...
- अण्णा त्यासाठी माझ्याकडे आयडिया आहे. बारमध्ये शिरताना सर्व कार्यकर्त्यांना पूर्ण चेहरा झाकून आत आणायचे आणि बाहेर पडताना त्यांना भुयारी मार्गाने बारपासून दूर नेऊन सोडायचे.
-पण समजा एखादा कार्यकर्ता रस्त्यावर टाईट होऊन पडलेला आढळला तर...
-त्याची चिंता आपण कशाला करायची अण्णा? आपले बिल भरून गेल्यावर आपला त्याच्याशी काय संबंध, शेवटी तो, त्याचे नशिब आणि त्याचा पक्ष बघून घेतील. काय?

जाता-जाता: संबंधित दारुबंदी पक्षाच्या कार्यालयाबाहेर दारु म्हणजे काय रे भाऊ ?असे ऐकू आले तर आश्चर्य वाटू नये.

# अभ्यासिकेत अभ्यास करणारा विद्यार्थी पोलीस खात्यात



**उल्हासनगर: कोविड सेंटर रद्द करण्यात आल्यावर उल्हासनगरातील डॉ.बाबासाहेब अभ्यासिका पुन्हा एकदा यूपीएससी, एमपीएससी विद्यार्थ्यांनी भरु लागली आहे. विशेष म्हणजे अभ्यासिकेत अहोरात्र अभ्यास करणाऱ्या आदेश केदार या गरजू विद्यार्थ्याची पोलीस खात्यात निवड झाली आहे.**

शिवसेनेचे आमदार डॉ.बालाजी किणीकर, शिवसेना शहरप्रमुख राजेंद्र चौधरी, युवासेना अधिकारी बाळा श्रीखंडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला आहे. यावेळी खासदार कार्यालय प्रमुख अरुण तांबे, पदाधिकारी विनोद सालेकर, जावेद शेख, केशव ओळेकर, राजू साळवे उपस्थित होते.

उल्हासनगरात गोरगरीब विद्यार्थ्यांच्या यूपीएससी, एमपीएससी अभ्यासासाठी अभ्यासिका असावी अशी सातत्यपूर्ण मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे बंडू देशमुख, मनोज शेलार करत होते. तेव्हा पालिकेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त 14 एप्रिल 2016 अभ्यासिकेचे भूमिपूजन केले होते. 25 मे 2018 रोजी अभ्यासिकेचा लोकार्पण सोहळा पार पडला होता. त्यात शेकडोंच्या संख्येने विद्यार्थी अभ्यासाकरिता येत होते. मात्र मागच्या वर्षी कोरोनाच्या काळात अभ्यासिकेचे रूपांतर कोविड सेंटरमध्ये करण्यात आले होते.

# आघाडीसाठी प्रयत्नशील पण लशींचे राजकारण अयोग्य

हे ठाण्यात आले होते. त्यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. यावेळी गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, शहराध्यक्ष आनंद परांजपे, प्रदेश सरचिटणीस तथा ठामपातील गटनेते नजीब मुल्ला, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव आदी उपस्थित होते. खासदार संजय पाटील यांनी भाजपात असल्यामुळे ईडीपासून वाचलो असल्याचे वक्तव्य केले आहे. त्याबद्दल पत्रकारांनी पाटील यांना विचारले असता, "ते खरेच आहे. आपल्याला ते साधारणपणे लक्षात येईल की, विरोधी पक्षात आहे म्हणून त्याच्या मागे सर्व एजन्सी लावण्याचे प्रकार सुरु झाले आहेत. त्यामुळे ज्यांच्यावर आधी ईडीच्या चौकश्या सुरु होत्या, भाजपात गेल्यानंतर त्यांचे दिवस सध्या सुखात आहेत. के.पी. गोसावीच्या अंगरक्षकाने केलेल्या गौप्यस्फोटाबाबत ते म्हणाले की, हे फार गंभीर आहे. म्हणजे, काय पद्धतीने महाराष्ट्र आणि देशात चालू आहे, हे दिसून येत आहे. ते अंमली पदार्थ खरे होते का? ते तिथे कसे पोहचले? ते अंमली पदार्थ कोणी ठेवले होते का? भाजपचे काही लोक धाडीदरम्यान दिसत आहेत. त्यामुळे या प्रकारात अनेक लोक असण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे बरे झाले की लोकांच्या समोर भाजपचा खरा चेहरा समोर यायला लागला आहे. भाजप आणि केंद्र सरकार आपल्या एजन्सीचा दुरुपयोग करते, हे आता स्पष्ट होऊ लागले आहे.

ठाण्यातील पाणीप्रश्नावर जयंत पाटील यांनी सांगितले की, वाढत्या नागरिकरणामुळे शहरांना पाणी कमी पडत आहे. सगळ्याच नागरी व्यवस्था वेगाने वाढताहेत की आपल्याकडे जलसंपदा विभागाने बांधलेली धरणे आता कमी पडू लागली आहेत. अगदी दमणगंगा, पिंजाळ या भागातून पाणी इकडे आणण्याचा एक पर्याय आपणाकडे आहे. असे अनेक पर्याय हुडकण्याचे काम सध्या सुरु आहे. उद्या सकाळी जलसंपदा विभागाची बैठक होत असून त्यामध्ये पाण्याच्या उपलब्धतेबाबत आपण चर्चा करणार आहोत.

ठाण्यातील लसीकरणाबाबत निर्माण झालेल्या वादाबाबत त्यांनी आनंद परांजपे यांचे कौतूकच केले. ते म्हणाले की, लस ही आपल्या केंद्राकडून राज्याला आणि नंतर ती सर्व शहरांना आणि जिल्हा परिषदांना पुरविण्यात आली आहे. गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी त्या भागातील नागरिकांनी लस घ्यावी, यासाठी आवाहन करणारे फलक लावले होते. हे आवाहन करणेदेखील काही समाजकंटकांना रुचलेले नाही. त्यांनी ते बॅनर फाडलेले आहेत. आमच्या आनंद परांजपे यांनी योग्य अशी मागणी केली आहे. त्यांनी बॅनर फाडणाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे. मला वाटते आनंद परांजपे यांची भूमिका योग्यच आहे.

दरम्यान, ठाणे शहरात झालेल्या राष्ट्रवादी परिवार संवाद कार्यक्रमामध्ये ठाणे शहर, कळवा- मुंब्रा, कोपरी-पाचपाखाडी, ओवळा-माजीवडा या मतदारसंघातील कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा तथा महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, युवती अध्यक्षा सक्षणा सलगर आदी उपस्थित होते.

# दीड हजार कोटींचा खर्च

डांबरी रस्ते, युटीडब्ल्यूटीचे रस्ते आणि सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यांचा समावेश आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अध्यादेशानुसार डांबरी रस्त्यांचे आयुर्मान 15 वर्ष, काँक्रीट रस्त्यांचे 30वर्ष आणि पुलाचे 100 वर्षांपर्यंत गृहीत धरुन काम करावे लागते. खड्डे पडल्यास, काम खराब झाल्यास किंवा पूल पडल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदार व संबंधीत पर्यवेक्षकीय अधिकारी यांची असते. यावरुन ठाण्यातील रस्त्यांबाबत पालिका संबंधित कंत्रादारांवर किती मेहेरबान आहे हे समोर येते.

रस्त्याचे काम केल्यानंतर ते खराब झाल्यास किंवा दुरुस्ती निघाल्यास ते काम करण्याची जबाबदारीही संपूर्ण ठेकेदाराची असते. ठाणे शहरातील गेल्या पाच वर्षात नूतनीकरण झाले आहेत, पण या रस्त्यांचे दुरुस्तीचे काम ज्या कंत्रादारावर येते त्यांना ते केले नसल्यामुळे दरवर्षी पालिका करोडो रुपयांचे टेंडर काढून रस्त्यांची दुरुस्ती करत ठेकदार आणि अधिकारी पालिकेच्या पैशांवर खिसा भरण्याचे काम करत असल्याचा आरोप मनसेने केला आहे.

ठाण्यातील रस्त्याच्या कामामधील भ्रष्ट युतीमुळे रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची केली जात आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात जर दुरुस्तीवर खर्च करूनही रस्त्यावर वारंवार खड्डे पडत असतील तर या संपूर्ण भ्रष्टाचाराच्या कामाची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणीही जोर धरु लागली आहे.

**पाच वर्षात रस्त्यांवर झालेला खर्च**

| वर्ष | खर्च |
|---|---|
| 2015-16 | 167 कोटी77 लाख 48 हजार 155 |
| 2016-17 | 149 कोटी 98लाख 15 हजार 192 |
| 2017 -18 | 224 कोटी 37 लाख 10 हजार 058 |
| 2018-19 | 251 कोटी 96 लाख 46 हजार089 |
| 2019-20 | 413 कोटी 13 लाख 61 हजार 717 |
| 2020-21 | 114 कोटी 25 लाख 25 हजार 847 |
| **एकूण** | **1321 कोटी 48 लाख07 हजार 058** |

# आघाडीला लसीकरणाच्या वादाचा सुरुंग

फाडले होते. त्याबद्दल डॉ. आव्हाड यांनी स्वतः बॅनर फाडल्याबद्दल संताप व्यक्त करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्याला नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी देखील प्रत्युत्तर दिले होते. हा वाद मिटण्याआधीच मागील आठवड्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष आनंद परांजपे आणि महापौर नरेश म्हस्के यांच्यात लसीकरण वादावरून जोरदार वाद झाला होता, त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्यात आघाडी होण्याची शक्यता मावळली असल्याचे बोलले जात आहे.

ठाणे शहरात राबोडी आणि लोकमान्य नगर या दोन प्रभागातील आठ नगरसेवक वगळता राष्ट्रवादी पक्षाची ताकद नाही, त्यामुळे सेनेचे पदाधिकारी राष्ट्रवादीला जागा सोडणार नाहीत आणि कमी जागा पदरात पाडून घेण्यासाठी राष्ट्रवादी तयार होणार नाही, त्यामुळेच आगामी निवडणुकीत सर्व पक्ष 'एकला चलो'ची भूमिका घेतील, असे राष्ट्रवादीमधील एका वरिष्ठ नेत्याने सांगितले.

आघाडी करायची की नाही हा निर्णय स्थानिक पातळीवर घेतला जाणार आहे, त्यामुळे आघाडीत बिघाडी होण्याची शक्यताच अधिक असल्याचे बोलले जात आहे.

# पोलिसांच्या कर्तव्य तत्परतेमुळे बेपत्ता बालके सुखरूप

रेल्वे स्टेशनच्या दिशेने एकमेकांचे हात धरून जाताना आढळून आलेल्या दोन्ही चिमुरड्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. या दोन्ही मुलांना त्यांची व्याकूळ झालेली आई चुडामणी सोनार हिच्या ताब्यात दिले.

# ठाण्यातील आठ प्रभागांत एक आकडी रुग्ण

209 नागरिकांची कोरोना चाचणी घेतली होती. त्यामध्ये 47जण बाधित मिळाले आहेत. आत्तापर्यंत 20 लाख 47 हजार 400 ठाणेकरांची चाचणी घेण्यात आली असून त्यामध्ये एक लाख 40 हजार 631जण बाधित सापडले आहेत.


SMART KALYAN DOMBIVLI DEVELOPMENT CORPORATION LTD.

**SMART KALYAN DOMBIVALI DEVELOPMENT CORPORATION LTD, KALYAN, THANE (M.S)**

**निविदा सूचना क्र. एसकेडीसीएल/०३/२०२१-२०२२**

**स्मार्ट कल्याण-डोंबिवली डेव्हलपमेंट कॉप्रोरेशन लिमिटेड येथे नोंदणीकृत अनुभवी कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी सीलबंद निविदा ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे मागवीत आहोत. या कामांची सविस्तर निविदा सूचना व कोरे निविदा फॉर्म** www.mahatenders.gov.in **या संकेतस्थळावर दि.२५/१०/२०२१ ते ०१/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. निविदा ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे दि.०१/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरता येतील. शक्य झाल्यास निविदा दि.०२/११/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता हजर असणाऱ्या निविदाकारांच्या समोर उघडण्यात येतील.**

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी रक्कम रुपये | अनामत रक्कम रुपये | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | एसकेडीसीएल कार्यालयासाठी हाऊसकिपींग, ऑफिस बॉय, सिक्युरिटी गार्ड आणि सुपरवायझर सेवा पुरविणेबाबत. | १०००/- | ५०,०००/- | १२ महिने |

यानंतर काही बदल/सूचना असल्यास त्या फक्त www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिल्या जातील.

जाक्र. कडोंमपा/जसंवि/मुका/६५८
दि.२२/१०/२०२१

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी,
एस.के.डी.सी.एल. कल्याण

**नवी मुंबई महानगरपालिका**

विद्युत विभाग

निविदा सुचना क्र.का.अ(वि)परी-2/36/2021-2022

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | घणेसाली विभागातील शाळा क्रं-42 येथील अंतर्गत विद्युतीकरणाची दुरुस्ती करणे. | 4,09,942/- |
| 2 | घणसोली विभागातील नागरी आरोग्य केंद्र से-06, नौसील नाका, रबाळे व कातकरीपाडा या ठीकाणी कोवीड-19 करीता Vaccination केंद्रामध्ये विद्युतीकरण करून Pedestal पंखे लावणे. | 3,01,262/- |

**निविदा पुस्तीका ई-निविदा (E-tendaring) सगणक प्रणालीच्या** www.nmmc.etenders.in **या संकेत स्थळावर व नमुंमपाच्या** www.nmmc.gov.in **संकेत स्थळावर दिनांक- 25/10/2021 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण** www.nmmc.etenders.in **या संकेत स्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा** (E-tendering) **प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संकर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त , नवी मुंबई मानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.**

सही/-
**कार्यकारी अभियंता (वि-2)**
**जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/929/2021 नवी मुंबई महानगरपालिका**

**जाहीर नोटीस** **ॲड. श्री. एस.एल. चौधरी**

**मुरबाड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी मुरबाड यांचे न्यायालयात**

इ.चौ. अ. नं. २१८/२०२१

**श्रीमती कुसुम कांताराम बांदल.,**
राहणार: मु. खेडले-तळवली, ता. मुरबाड, जि. ठाणे. **...अर्जदार**

**विरूध्द**

**निबंधक जन्म- मृत्यु,**
ग्रामपंचायत मौजे- खेडले-तळवली,
ता. मुरबाड, जि. ठाणे. **...सामनेवाला**

तमाम जनतेस या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार **श्रीमती कुसुम कांताराम बांदल** यांचे पती **कै. कांताराम लक्ष्मण बांदल** यांचा मृत्यु दि. ०१/११/१९९५ रोजी मौजे खेडले-तळवली, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराने जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे मृत्यु तारखेची नोंद करून मृत्यु दाखला मिळणेकामी प्रथम वर्ग न्यायादंडाधिकारी मुरबाड या न्यायालयामध्ये इतर चौकशी अर्ज क्रमांक २१८/२०२१ दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी स्वतः किंवा वकिलांमार्फत ही नोटिस जाहिर दिनांकापासुन ३० दिवसांचे आत मुरबाड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात तोंडी अथवा लेखी हरकत नोंदवावी. नमुद कालावधीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार **श्रीमती कुसुम कांताराम बांदल** यांना त्यांचे पती **कै. कांताराम लक्ष्मण बांदल** यांचा मृत्यू दाखल्याचे नोंदणी मिळण्यास कोणाचीही हरकत नाही असे समजुन मृत्यू दाखला नोंदणी आदेश अर्जदार यांचे हितात देण्यात येईल व तद्नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

**ठिकाण** : मुरबाड,
**दिनांक** : ०६/१०/२०२१

कोर्टाचा शिक्का

सही/-
**क. लिपीक**

सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, मुरबाड

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

अग्निशमन विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडील रेडीओ ट्रंकींग सिस्टीमची (Non Comprehensive) वार्षिक निगा, देखभाल व दुरुस्ती करणेबाबत व विविध प्रकारचे वुड कटर खरेदी करणेबाबत अशाप्रकारच्या दोन कामांकरीता निविदा ई टेंडरींग पध्दतीने मागविण्यांत येत आहेत. निविदा महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.२५/१०/२०२१ ते दि.०८/११/२०२१ या कालावधीत उपलब्ध असतील. सदरच्या निविदा ई टेंडरिंग पध्दतीने दि.०८/११/२०२१ रोजी १६.०० वाजे पर्यत स्विकारण्यात येतील.सदर निविदा दि.१५/११/२०२१ रोजी १६.३० वा. निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यांत येईल. निविदा सुचना आणि प्रपत्र ठाणे महानगरपालिकेची अधिकत संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे. ई टेंडरिंग बाबत अधिक माहितीसाठी अग्निशमन विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे येथे संपर्क साधावा.

ठामपा/पिआरओ/अग्निशमन/७८६/२०२१-२२ **सही/-**
दि:२२.१०.२०२१ मुख्य अग्निशमन अधिकारी
*plsvisitourofficialweb-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
***www.thanecity.gov.in***

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

**CLASSIFIEDS ठाणेवैभव**

**छोट्या जाहिरातींसाठी संपर्क कार्यालय ठाणे - २५३४१५२६/२५३४८५९४**

**ऑफिस भाड्याने देणे आहे**

टोटल कार्पेट एरिया, ११५८.६७ स्क्वे.फु., ३ कॅबिन, १ रिसेप्शन, १ पॅन्ट्री, २ बाथरूम टेरेस सोबत शिवनेरी बिल्डिंग, पहिला माळा, गावदेवी, ठाणे रेल्वे स्टेशनजवळ. ८९७६८२३७५२

**विकणे आहे**

टेंभी नाका परिसरात २०० आणि २५० चौ.फूटाचा बेसमेंट गाले विकायला आहे. संपर्क - ९८१९२४९२८०

**पाहिजेत**

नामांकित रक्तपेढीसाठी डिलेव्हरीसाठी (बाईक असणाऱ्यास प्राधान्य) मुले पाहिजेत. पत्ता - ब्लडलाईन ब्लड बँक, आंबेडकर रोड, खोपट, ठाणे (प) संपर्क - ०२२-२५३७५०००/ ६०००

**WANTED**

Male Accounts Assistant 12th or Graduate pass for a Showroom at Thane Contact : 9820441155 or 9820118786 Email : a1furniture@rediffmail.com

**'ठाणेवैभव' दैनिकातील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार छापल्या जातात. या मजकुराच्या सत्यतेबाबतची खातरजमा वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. 'ठाणेवैभव' यांचा याबाबत कोणतीही आर्थिक वा कायदेशीर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदारी राहणार नाही.**


'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून दामले अपार्टमेंट, टेंभीनाका, ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

# फोकस

**कोविड प्रतिबंधक लसीकरणामध्ये भारताने एक महत्त्वाचे उद्दिष्ट गाठले आहे. असंख्य प्रश्नांवरून सुरु झालेला लसीकरणाचा प्रवास आता १०० कोटी लसींच्या डोसवर येऊन पोहोचला आहे. यामध्ये सर्वाधिक मोठा वाटा कुणाचा असेल तर तो आरोग्य कर्मचाऱ्यांचा आणि आरोग्य सेवकांचा. जानेवारी २०२१ पासून अविरतपणे, ग्रामीण भागातील डोंगर दऱ्यापासून शहरातील झोपडपट्टीपर्यंत आरोग्य कर्मचाऱ्यांनी दिलेली सेवा देश कधी विसरणार नाही. काही वर्षांपूर्वी असाच प्रकारे सरकारी आरोग्य कर्मचाऱ्यांनी केलेल्या मेहनतीमुळे भारताने एका दिवसात २० कोटी बालकांना पोलिओ लस देण्याचा विश्वविक्रम केला होता.**




## लसीकरणातील भरारी

■ डॉ. नानासाहेब थोरात
वरिष्ठ शास्त्रज्ञ, ऑक्सफर्ड विद्यापीठ, लंडन

भारतामध्ये कोव्हीड-१९ च्या लसीचा पहिला डोस १६ जानेवारी २०२१ दिवशी दिला गेला. १३० कोटी लोकसंख्येच्या या देशात लसीकरण किती वेगाने होईल, शहरामध्ये लोकांना लस लवकर मिळेल मात्र डोंगरदऱ्यात असणाऱ्या खेडेगावात लस पोहोचेल का, कशी पोहोचणार, लसीकरणाला लोकांचा प्रतिसाद मिळेल की नाही या आणि अशा असंख्य प्रश्नांवरून सुरु झालेला प्रवास आता १०० कोटी लसींच्या डोसवर येऊन पोहोचला आहे. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या टप्प्यामध्ये भारताने दोन्ही डोस मिळून १०० कोटींचा टप्पा पूर्ण केला. यामध्ये जवळपास ७० कोटी लोकांना म्हणजेच देशातील ५० टक्के लोकसांख्येला पहिला डोस तर २८ कोटी लोकांना म्हणजेच देशातील २१ टक्के लोकसांख्येला दोन्ही डोस मिळाले आहेत. भारताआधी १०० कोटी लसींचा टप्पा पूर्ण करणारा चीन हा देश असून त्यांनी जून २०२१ मध्ये हा टप्पा पूर्ण केला आहे. भारताशेजारील बांगलादेशमध्ये हेच प्रमाण एक डोस आणि दोन डोस असे अनुक्रमे २३ टक्के आणि ११ टक्के, पाकिस्तानमध्ये २९ आणि १५ टक्के, चीनमध्ये ८० आणि ७५ टक्के, जपानमध्ये ७६ आणि ६७ टक्के एवढे आहे. युरोपियन देशांचा विचार केला तर जर्मनीमध्ये ६८ आणि ६५टक्के, फ्रान्स ७५ आणि ६७ टक्के, इटली ७७ आणि ७१ टक्के, इंग्लंड ७३ आणि ६७ टक्के, स्पेन ८० आणि ७८ टक्के तर सर्वात जास्त पोर्तुगाल मध्ये हे प्रमाण ८७ आणि ८५ टक्के एवढे आहे. अमेरिकेत ६६ आणि ५७ टक्के, कॅनडा ७७ आणि ७३ टक्के, ब्राझील ७३ आणि ५० टक्के, आणि मेक्सिको मध्ये ५३ आणि ३९ टक्के आहे. आफ्रिकन देशांमध्ये दोन्ही डोस मिळण्याचे प्रमाण जगाच्या तुलतनेत खूपच कमी आहे, दक्षिण आफ्रिका २३ आणि १८ टक्के, झिम्बाब्बे २१ आणि १६ टक्के, केनिया ६ आणि २ टक्के, इजिप्त १३ आणि ७ टक्के, इथोपिया २.६ आणि ०.८ टक्के, सुदान १.५ आणि १.३ टक्के, नायजेरियामध्ये २.६ आणि १.३० एवढे कमी आहे. आखाती देशांमध्ये सौदी अरेबियामध्ये ६८ आणि ५८ टक्के, दुबईमध्ये जगातील सर्वाधिक म्हणजेच ९६ आणि ८६ टक्के, ओमान ५८ आणि ४४ टक्के, इराण ५८ आणि ३० टक्के, इराक १३ आणि ८ टक्के तर इस्राईलमध्ये ६७ आणि ६१ टक्के असे आहे.

भारताचा विचार केला तर ६० वर्षावरील १० कोटी जणांना पहिला आणि ६ कोटी जणांना दुसरा डोस दिला गेला आहे. ४५ ते ६० वर्षांमधील वयोगटात १६ कोटी पहिला आणि ९ कोटी दुसरा डोस दिला. १८ ते ४४ वयोगटात ३९ कोटी पहिला आणि १२ कोटी दुसरा डोस दिला गेला आहे.

खडतर प्रवास

जगाला अतिशय अवघड वाटणारे हे ध्येय साध्य करण्यासाठी सर्वात मोठा कुणाचा हातभार असेल तर तो म्हणजे लस निर्माण करणाऱ्या सरकारी संशोधन संस्था आणि खासगी कंपन्या. १८ ऑक्टोबर २०२१ च्या आकडेवारीनुसार भारतामध्ये तीन लसी लसीकरणासाठी उपलब्ध होत्या. त्यामध्ये कोव्हीशील्ड लसीच्या डोसचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ८६ कोटी एवढे होते. त्यानंतर कोव्हॅक्सिन ११ कोटी तर स्फुटनिकचे प्रमाण १ कोटीच्या आसपास होते. भारत सरकारच्या अधिकृत आकडेवारीनुसार भारताची लस निर्मितीची क्षमता ही महिन्याला ११ ते १२ कोटी एवढी आहे.

मार्च ते मे २०२१ महिन्यात लसींचा काही प्रमाणात तुटवडा निर्माण झाला होता. त्यासाठी जागतिक परिस्थिती म्हणजेच कच्च्या मालाचा तुटवडा कारणीभूत होती. त्याचबरोबर इतर देशांच्या तुलनेत आपण लसींची मागणी करण्यात केलेला उशीर तसेच लस निर्मिती करणाऱ्या एक-दोन कंपन्यांवरच विसंबून राहणे हेही तेवढेच कारणीभूत होते. पण त्यातूनही मार्ग काढत आपल्या देशाने १०० कोटी लसींच्या डोसची निर्मिती आणि वितरण इथवरचा टप्पा पूर्ण केला आहे, ही बाब उल्लेखनीय आहे.

कोविड प्रतिबंधक लसीकरणाला सुरवात झाली तेव्हा लोकांचा असणारा प्रतिसाद हळूहळू कमी झाला होता. त्यामुळेसुद्धा लसीकरण संथगतीने झाले. मार्च २०२१ पासून दुसरी लाट सुरु झाल्यानंतर मात्र लोकांची लसीसाठी झुंबड उडाली. सोशल मीडिया आणि काहीवेळा टीव्ही आणि प्रिंट मीडिया मधून गेलेला चुकीचा संदेश यामुळेसुद्धा लस घेण्याबद्दल लोकांची निराशा दिसून आली. मात्र अतिशय वेगाने आलेल्या दुसऱ्या लाटेनंतर मात्र सर्व गैरसमज विसरून लोकांचा लस घेण्याकडे कल दिसून आला आणि त्यामुळेच आपण १०० कोटीच्या टप्प्यावर पोहोचलो. १०० कोटींच्या टप्प्यावर येताना यामध्ये सर्वाधिक मोठा वाटा कुणाचा असेल तर तो आरोग्य कर्मचाऱ्यांचा आणि आरोग्य सेवकांचा.

कव्हर स्टोरी

जानेवारी २०२१ पासून अविरतपणे सकाळी आठ ते रात्री आठ, ग्रामीण भागातील डोंगर दऱ्यापासून शहरातील झोपडपट्टीपर्यंत आरोग्य कर्मचाऱ्यांनी दिलेली सेवा देश कधी विसरणार नाही. या त्यांच्या अविरत मेहनतीचे फळ आहे. काही वर्षांपूर्वी असाच प्रकारे सरकारी आरोग्य कर्मचाऱ्यांनी केलेल्या मेहनतीमुळे भारताने एका दिवसात २० कोटी बालकांना पोलिओ लस देण्याचा विश्वविक्रम केला होता. जगाला अशक्यप्राय वाटणारे असे आवाहन भारताने पेलले, त्याच्यामागे असणारी भारतीय सरकारी आरोग्य यंत्रणा आणि तिचे परिश्रम. या आरोग्य कर्मचाऱ्यांचा मेहनतीमुळेच पोलिओच्या सार्वत्रिक लसीकरणादिवशी एका दिवसात ६,४०,००० लसींचे बूथ, २३ लाख स्वयंसेवक, २० कोटी लसीचे डोज, आणि जवळपास १७ कोटी १ ते ५ वयातील बालकांना ही लस देण्याचा विक्रम भारताने केला. एवढी भारताची आरोग्यसेवा सक्षम आहे; मग ते शहरी भाग असो किंवा दुर्गम खेडे असो. सन १९९६ पासून केंद्र सरकार आणि राज्य सरकारांची आरोग्य यंत्रणा यांच्या साहाय्याने सन २०१२ मध्ये भारत पोलिओ मुक्त झाला.

लसीकरणाचा पुढचा प्रवास आणि कोव्हिडची स्थिती

आजच्या दिवसाचा विचार केला तर दुसरी लाट संपली आहे असेच सर्वांना वाटत आहे. कदाचित पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत कोट्यवधी लोकांना कोव्हीड होऊन गेलेला असून त्यांना कोणतीही लक्षणे दिसली नाहीत किंवा त्रास झाला नाही. त्यामुळेच भारत सध्या हर्ड इम्म्युनिटी म्हणजेच समाजाची कळप प्रतिकारशक्ती तयार होण्याकडे वाटचाल करत आहे. लसीकरणाला जर हर्ड इम्युनिटीची जोड मिळाली तर हा संसर्गजन्य रोग काही कालावधीतच कमी होईल; मात्र संपूर्णपणे समाजातून निघून जाईल असे म्हणता येणार नाही. फक्त भारताचे किंवा युरोप-अमेरिकन देशांचे लसीकरण होऊन उपयोग नाही तर वरच्या परिच्छेदात जगाच्या तुलनेत लसीकरणात अतिशय मागे असणाऱ्या आफ्रिकन देशांचेही याच वेगाने लसीकरण झाले पाहिजे. भारत सरकारच्या लसीकरणाच्या सध्याच्या नियमानुसार आजचा विचार केला तर भारतामध्ये कमीत कमी ९० ते १०० कोटी लोक लसीकरणासाठी पात्र आहेत. म्हणजेच आजही भारताला किमान १०० कोटी डोसची गरज आहे. याच वेगाने लसीकरण होत राहिले तर मार्च २०२२ पर्यंत किंवा त्यापूर्वी आपण देशातील ७० टक्के लोकसंख्येला दोन्ही डोस देऊ शकतो. हर्ड इम्युनिटी मिळवण्यासाठी कमीत कमी ७० टक्के लोकसंख्येला लसीचे दोन्ही डोस मिळण्याची गरज आहे.

पुढचा टप्पा महत्वाचा

भारतीय लसीकरण आता महत्वाच्या टप्प्यावर येऊन पोहोचले आहे. हा टप्पा म्हणजे लहान मुलांचे लसीकरण. देशातील सर्वच राज्यांनी महाविद्यालये आणि मुलांच्या शाळा सुरु केल्यामुळे कोव्हिडची लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात येते. कदाचित अशी लाट आली तरी लहान मुलांना त्याचा फार मोठा धोका असणार नाही. परंतु त्यांचे लसीकरण होणे तेवढेच महत्वाचे आहे. सध्या भारतात फक्त एकच म्हणजे कोव्हॅक्सिन या लसीच्या मुलांवरील केलेल्या चाचणीचे निष्कर्ष आले आहेत. मात्र किमान २० कोटी मुलांना लसीचे डोस कमीत कमी वेळेत द्यायचे असतील तर कोव्हॅक्सिन लसीची निर्मिती करणाऱ्या कंपनीची तेवढी क्षमता आहे की नाही हे पाहावे लागेल. त्याचबरोबर जगातील अनेक देशांमध्ये फायजर कंपनीची लस १२ ते १८ वर्षे वयोगटात दिली जात आहे. त्या लसीचाही विचार आपल्याला करावा लागणार आहे. साधारणपणे ६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांचे लसीकरण कसे करता येईल याचे प्रयत्न आतापसूनच केले पाहिजेत. कारण त्याशिवाय आपण सहजासहजी या महामारीतून बाहेर पडणार नाही. लहान मुलांबरोबरच अजून एक प्रश्न आहे तो म्हणजे दुसऱ्या डोसचे कमी प्रमाण. इतर देशांच्या तुलनेत भारतामध्ये पहिल्या आणि दुसऱ्या डोसमधील टक्केवारीत खूपच तफावत आहे. येणाऱ्या काळात तातडीने ती दूर केली पाहिजे. यासाठी दुसऱ्या डोसचे प्रमाण वेगाने वाढवले पाहिजे. सध्या जगात तिसऱ्या डोसची तयारी केली जात आहे. अमेरिका, काही युरोपियन देश आणि इस्राईल यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना तिसरे डोस देण्याची सुरवात केली आहे. भारताने याचाही विचार करण्याची गरज आहे. आतापसूनच आपण याबाबत काम सुरु केले तर पुढची तिसऱ्या लाटेची तीव्रता अजून कमी होईल आणि आज जो आपण १०० कोटींचा टप्पा पूर्ण केला आहे तो उत्सव आणि उत्साह दीर्घकाळ टिकवता येईल.

**(लेखक ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी, इंग्लंड येथील मेडिकल सायन्स डिव्हिजनमध्ये वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत.)** ◆◆◆

---


टिचकी

हिमांशू चौधरी

## मोठेपणा

स्वतःविरुद्धची लढाई ही सर्वांत मोठी लढाई असते, असं म्हणतात. कारण इतरांना त्यांच्या चुका दाखवून देण्यात कोणताच पुरुषार्थ नसतो. पुरुषार्थ असतो स्वतःला स्वतःची चूक दाखवून देण्यात. चुका सुधारत राहिलं तर हळूहळू माणसात 'परफेक्शन' येतं आणि कोणत्याही आव्हानांना सामोरं जाण्यास तो सज्ञ होतो. परंतु नेमकं इथेच घोडं पेंड खातं. चूक सुधारण्याच्या मार्गात तीन टप्पे आवश्यक असतात. पहिला टप्पा चूक समजण्याचा असतो, दुसरा ती मान्य करण्याचा आणि तिसरा ती दुरुस्त करण्याच्या प्रयत्नांचा. परंतु बहुतांश लोक पहिल्या-दुसऱ्या पायरीवरच अडखळतात. आपली चूक कदापि मान्य न करणं हा आपल्याकडे काहीजण मर्दपणा मानतात आणि चूक कबूल करणं हा कमकुवतपणा किंवा पराभव! वास्तविक, मान्य करणं म्हणजे अपमान नव्हे एवढं जाणण्याइतकी खिलाडूवृत्ती आपल्याकडे हवी. परंतु आपल्याकडे राजकीय व्यक्तींच्या ज्या काही सवयी समाजातही खोलवर मुरल्यात, त्यातली महत्त्वाची सवय म्हणजे चूक नाकारणं. चूक दाखवून देणाऱ्याला ही मंडळी उलट त्याचीच एखादी चूक दाखवून देतात आणि वेळ मारून नेतात. ''आमच्याविषयी बोलण्यापेक्षा स्वतःच्या घरात काय जळतंय हे पाहा,'' हा तर राजकारण्यांचा लाडका डायलॉग! भ्रष्टाचाराच्या आरोपांपासून सरकार पडण्याच्या चर्चेपर्यंत आणि आंतरराष्ट्रीय विषयांपासून बोटीवरच्या रेव्ह पार्टीपर्यंत सर्वत्र एकच थाट दिसून येतो. तुम्ही बरोबर आणि आम्ही चूक असणं अशक्य!

याच कारणामुळं माणूस मोठं होण्याचा प्रयत्न करूनही खुजाच राहतो. खऱ्या अर्थानं मोठा असणारा माणूस कोणत्याही वयात, जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर चूक स्वीकारून 'सॉरी' म्हणतो. म्हणूनच तो मोठा असतो. 'बिग बी' म्हणून लोकप्रिय असलेले महानायक अमिताभ बच्चन यांनी हा 'मोठेपणा' नुकताच दाखवून दिला. खरं तर चूक साधीच. ती दाखवून देणाऱ्याकडे दुर्लक्ष करता येणंही सहज शक्य होतं. पण या



महानायकाने तसं केलं नाही. दसऱ्याच्या शुभेच्छा देण्यासाठी त्यांनी केलेल्या पोस्टमध्ये 'दशहेरा' असा शब्द वापरला. त्यावर पाटण्यातील एका तरुणानं त्यांना 'आपण हिंदीतील एका महान कवीचे सुपुत्र आहात,' अशी आठवण करून दिली आणि 'दशानन रावण हरा' म्हणून 'दशहरा' असा हा शब्द लिहितात, हे बिग बींच्या निदर्शनास आणून दिलं. ''कमर्शियल अॅड की तो छोडिये, कम से कम वर्तनी के बारे में मेटिक्यूलस रहिए'' अशा शब्दांत एखाद्या तरुणाने दिलेला सल्ला बिग बींनी दुर्लक्षित केला असता, तर काय बिघडलं असतं? असाच सल्ला एखाद्या जिल्हा पातळीवर काम करणाऱ्या राजकीय पुढाऱ्याला देऊन पाहा बरं! एक तर तो दुर्लक्ष करेल किंवा 'आधी तुझी भाषा सुधार' असं म्हणून समोरच्यालाच वेड्यात काढू पाहील.

परंतु अमिताभ यांनी या तरुणाचं म्हणणं मान्य केलं. चूक लक्षात आणून दिल्याबद्दल त्याला धन्यवाद दिले. 'पुढे अशी चूक होणार नाही याची काळजी घेईन,' असं उत्तर दिलं. याच तरुणाने 'खुदा गवाह' चित्रपटात अमिताभ यांनी 'पेशेवर' या शब्दाचा उच्चार 'पेशावर' असा केला होता, याचीही त्यांना आठवण करून दिली आणि अमिताभ यांनी तेही मान्य केलं. अमिताभ ज्या उंचीवर आज आहेत, तिथं हा खरोखर चमत्कारच ठरतो. ◆◆◆

---

■ डॉ. जयदेवी पवार

**उत्तर प्रदेशात पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा चेहरा म्हणून प्रियांका गांधी असणार आहेत. त्यांनी आक्रमकपणे काँग्रेसची धुरा सांभाळायला घेतली आहे. आधी लखीमपूर खेरीमध्ये त्यांनी योगी आदित्यनाथ सरकारला धारेवर धरले आणि आता 'लडकी हूँ, लड सकती हूँ' अशी एक नवी घोषणा करून लोकांच्या मनात स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ही घोषणा करताना प्रियांकांनी उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या ४० टक्के उमेदवार या महिला असतील असे जाहीर केले आहे. यानिमित्ताने त्यांनी राजकारणातील महिलांचे स्थान या मुद्द्याकडे लक्ष वेधले आहे.**

## नवी रणनीती तारणार का?

उत्तर प्रदेशात पुढील वर्षी विधानसभा निवडणुका होत आहेत. या निवडणुकीत काँग्रेसची भूमिका काय असेल याकडे सगळ्यांचे लक्ष आहे. उत्तर प्रदेशाच्या राजकारणात काँग्रेसला आधीच समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्ष यांची मोठी स्पर्धा आहे. भाजपविरोधी मते एकवटताना भाजपबरोबरच या दोन पक्षांचा मुकाबलाही काँग्रेसला करावा लागणार आहे. अर्थात या पक्षांबरोबर काँग्रेसने युती केली तर गोष्ट वेगळी. पण सध्या तरी अशी काही चिन्हे नाहीत.

उत्तर प्रदेश काँग्रेसची धुरा प्रियांका गांधी वाड्रा यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. प्रियांका गांधींनी ही जबाबदारी मोठ्या आक्रमकपणाने पार पाडायची असे ठरवलेले दिसते. लखीमपूर खेरी येथे ३ ऑक्टोबर रोजी झालेल्या घटनेत ८ व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यावेळी प्रियांका गांधी आक्रमकपणे उत्तर प्रदेशच्या पोलिसांबरोबर वाद घालत असल्याची छायाचित्रे आणि व्हिडीओ सगळीकडे प्रदर्शित झाले. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना त्यावेळी प्रियांका गांधींमध्ये इंदिरा गांधीच दिसल्या.

प्रियांकांमध्ये इंदिरा गांधींचे कोणते गुण आहेत ते येणारा काळच ठरवेल. पण उत्तर प्रदेशात त्यांनी आक्रमकता दाखवत पक्षाचे नेतृत्व करायचे ठरवले आहे याची मात्र पदोपदी प्रचिती येत आहे. आधी लखीमपूर खेरीमध्ये त्यांनी योगी आदित्यनाथ सरकारला धारेवर धरले आणि आता 'लडकी हूँ, लड सकती हूँ' अशी एक नवी घोषणा करून लोकांच्या मनात स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

ही घोषणा करताना प्रियांकांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात काँग्रेसच्या ४० टक्के उमेदवार या महिला असतील असे जाहीर केले आहे. यांद्वारे त्यांनी एक संदेश मतदारांना दिला आहे. अर्थात केवळ महिला उमेदवारांबद्दल घोषणा करून भागणार नाही. प्रत्यक्षात कोणत्या महिला उमेदवार असतील आणि त्या उमेदवार असतील तर इच्छुक पुरुष उमेदवार हे कितपत आणि कसे स्वीकारतील याबद्दल कुणाला काही अंदाज नाही. मात्र ही घोषणा करून काँग्रेसमध्ये प्रियांकांनी जान आणण्याचा प्रयत्न नक्कीच केला आहे.

प्रासंगिक

महिलांना अधिक प्रतिनिधीत्व देण्यासाठी असा निर्णय घेणाऱ्या प्रियांका एकट्याच नाहीत. दोन वर्षांपूर्वी पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी लोकसभा निवडणुकांसाठीच्या ४२ जागांपैकी १७ जागांवर महिला उमेदवारांना तिकिटे दिली होती. प्रियांकांच्या निर्णयानंतर अलीकडेच दीदींनी ४० टक्के तिकिटे महिलांना देण्यात आपलाच पहिला नंबर असल्याचे ट्विटही केले. राजकीय पक्ष निवडणुकांमध्ये तिकिट वाटपादरम्यान नेहमीच महिलांना अधिक संधी देण्याच्या घोषणा करत असतात.




२०१९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी या राज्यातील ३३ टक्के जागांवर बीजू जनता दलाच्या महिला उमेदवारांना उमेदवारी देण्याची घोषणा केली होती. देशभरातील सर्वच राजकीय पक्षांकडून आपापल्या संघटनांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र विभाग किंवा आघाडी तयार केली जाते. तथापि, आजही लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांमधून महिला प्रतिनिधींची संख्या खूप कमी आहे.

१९९० च्या दशकात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याचा निर्णय शरद पवार यांच्या पुढाकाराने घेण्यात आला. मात्र विधानसभा आणि लोकसभेत महिलांना आरक्षण देण्याचा मुद्दा अनेक वर्षे भिजत पडला आहे. महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मंजूरच होऊ शकत नाही, असे चित्र काँग्रेस प्रणीत संयुक्त लोकशाही आघाडी सरकारच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात दिसले. काँग्रेसने राज्यसभेत हे विधेयक मंजूर करून घेतले. मात्र लोकसभेत मुलायमसिंग यादवांचा समाजवदी पक्ष तसेच लालू प्रसाद यादव यांचा राष्ट्रीय जनता दल यासारख्या पक्षांमुळे महिला आरक्षणाचे विधेयक मनमोहन सिंग सरकारला लोकसभेपुढे मांडताही आले नव्हते. गेल्या ७ वर्षांतही याबाबत सकारात्मक पावले पडताना दिसून आली नाहीत.

विशेष म्हणजे जगभरात राजकारणात महिला सक्रिय होण्याचे प्रमाण वाढत आहे. या यादीत रवांडाचे स्थान पहिल्या क्रमाकांवर आहे. सप्टेंबर २०१३ मध्ये या देशात झालेल्या निवडणुकांमध्ये महिलांचे विजयाचे प्रमाण ६३.८ टक्के होते. जगातील ही पहिलीच घटना होती की, महिला खासदारांचे प्रमाण साठ टक्क्यांवर पोचलेले होते. आजही हे प्रमाण ६१.२३ टक्के इतके आहे. दक्षिण आशियातील आपल्या शेजारील देशांची स्थिती पाहिल्यास श्रीलंकेत महिलांनी अध्यक्षपद आणि पंतप्रधानपद सांभाळलेले असतानाही संसदेतील महिलांचे प्रमाण एक टक्क्याहून कमी आहे. नेपाळमध्ये आतापर्यंत कधीही महिला पंतप्रधान झाल्या नाहीत. मात्र संसदेतील महिलांचे प्रमाण हे ३० टक्के दिसून आले आहे. चीनमध्ये



महिला प्रतिनिधींचे प्रमाण २५ टक्के आहे. गेल्या काही वर्षांत अरब राष्ट्रांमध्ये महिलांचा राजकारणातील सहभाग वाढताना दिसत आहे. भारतातही असे दृश्य दिसून येते; पण राजकीय पक्षांच्या निवडून येण्याचे निकष हा यातील मोठा अडसर आहे. या पार्श्वभूमीवर प्रियांका गांधींनी घेतलेला निर्णय आशादायक ठरणारा आहे. तथापि, काँग्रेस पक्षाची आजवरची परंपरा पाहता घराणेशाहीची जपणूक करत त्या पक्षातील जुन्या जाणत्या नेत्यांच्या कुटुंबातील महिलांनाच पुन्हा संधी देतात की नव्या चेहऱ्यांना, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

उत्तर प्रदेशात काँग्रेसपुढे मोठी आव्हाने आहेत. पक्षाने तेथे एकट्याने निवडणूक लढवण्याचा निर्णय आत्ता तरी घेतलेला आहे. पण काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव इम्रान मसूद यांनी काँग्रेसने समाजवादी पक्षाबरोबर युती करावी असा विचार बोलून दाखवला आहे.

राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसचे नेतृत्व सोनिया गांधी करत असल्याचे फायदे आता काँग्रेसला होतील यात शंका नाही. एक तर भाजपच्या विरोधात विरोधी पक्षांची आघाडी करायची झाल्यास त्याचे नेतृत्व आपसूकच काँग्रेसकडे येईल. कारण इतर विरोधी पक्षांत बहुतांश प्रादेशिक पक्ष आहेत आणि आपापल्या राज्यांपलिकडे त्यांना फारसा जनाधार नाही. काँग्रेस राष्ट्रीय पक्ष आहे आणि आता त्याचे बळ कमी झाले असले तरी तो पक्ष संपलेला नाही. शिवाय सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखाली दोन वेळा काँग्रेसने केंद्रात सत्ता मिळवली आहे. त्यामुळे काँग्रेसच्या उत्तर प्रदेशातील कामगिरीकडे संपूर्ण देशाचे लक्ष असणार आहे.

प्रियांका गांधींना हे सर्व ध्यानात ठेवून रणनीती आखावी लागणार आहे. उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांच्या सरकारने धडाकेबाज कामगिरी केली आहे. पण त्याचबरोबर त्यांच्याविरोधात विरोधक एकवटणार हेही खरेच आहे. सध्या तरी काँग्रेसचे धोरण एकट्याने निवडणूक लढवण्याचे आहे. या निवडणुकीत काँग्रेसला किती यश मिळेल याचा अंदाज आत्ताच येणार नाही. पण प्रियांका गांधी पक्षाला आणि राज्यातील जनतेलाही ठोस कार्यक्रम देऊ शकल्या तर काँग्रेसला उत्तर प्रदेशात पुन्हा पाय रोवता येतील.

प्रियांका गांधींनी नेतृत्व करावे अशी इच्छा उत्तर प्रदेश काँग्रेसची होती आणि आता ती पूर्ण झाली आहे. निवडणुकीच्या निमित्ताने त्या राज्यात प्रियांकांना कार्यकर्त्यांची फळी उभी करावी लागणार आहे. त्यासाठी त्या मेहनत घेताना दिसत आहेत. सर्वात महत्वाचे आहे ते राज्यात काँग्रेसची धोरणे आणि कार्यक्रम काय असणार आहेत हे स्पष्ट करणे. केवळ भाजपविरोध निवडणुकीत पुरेसा नाही. तितकाच भक्कम कार्यक्रम जनतेसमोर ठेवणेही आवश्यक आहे. चाळीस टक्के महिला उमेदवार देण्याची घोषणा प्रियांकांनी केली आहे. पण मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार कोण असेल हे जाहीर करण्यात आलेले नाही. महिलांना मोठ्या संख्येने उमेदवारी देताना मुख्यमंत्रीपदाची उमेदवारही महिला असेल का याची उत्सुकता सगळ्यांना आहे. महिला असेल तर ती खुद्द प्रियांकाच असणार का, हा प्रश्नही सगळ्यांना सतावत आहे.

प्रियांका गांधींनी उत्तर प्रदेशात आक्रमकपणे आघाडी घेतली आहे. निवडणूक प्रचारात हा आक्रमकपणा किती कामाला येतो हे लवकरच दिसून येईल. ◆◆◆

# विचारांचे वैभव



# विज्ञानाचा 'जीवघेणा' इतिहास !

"we would be 1,500 years ahead if it hadn't been for the religion dragging science back and burning our best minds at the stake" - Catherine Fahringer.

विज्ञानाचा इतिहास चाळल्यानंतर एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते ती म्हणजे आत्तापर्यंत विज्ञानात झालेली प्रगती काही सुखासुखी झाली नाही, त्यात अनेक अडथळे आले, अनेकांना यातना सोसाव्या लागल्या आणि कित्येकांना आपला जीव गमवावा लागला. विज्ञानाने लावलेले शोध जर प्रचलित धार्मिक समजुतीपेक्षा काही वेगळं सांगत असतील, तर धार्मिक नेत्यांनी त्यांना नेहमी विरोध केला आणि ते शोध लावणाऱ्या वैज्ञानिकांचा आणि अंधश्रद्धेपायी असंख्य निष्पाप लोकांचा अनोनात छळ केला याचे असंख्य दाखले इतिहासात आहेत.

पृथ्वी स्थिर असून ती विश्वाच्या केंद्रस्थानी आहे आणि इतर सर्व ग्रह-तारे पृथ्वीभोवती फिरतात, अशी एकेकाळी चर्चची समजूत होती. प्रत्यक्षात तसं नसल्याचं कोपर्निकस (१४७३-१५४३) या खगोल शास्त्रज्ञाला त्याच्या संशोधनात आढळलं. पण धार्मिक नेत्यांची जरब इतकी जबरदस्त होती की सत्य बोलून दाखविण्याचे धैर्य त्याला झालं नाही. पण तो मृत्यूशय्येवर असताना १५४३ साली त्याने एक पुस्तक प्रसिद्ध केलं आणि त्यामध्ये पृथ्वी स्थिर नसून स्वतःभोवती सतत फिरत असते आणि त्याचवेळी ती सूर्याभोवतीदेखील फिरते याचा उल्लेख केला. हे पुस्तक कोपर्निकस मृत्यूशय्येवर असताना प्रसिद्ध झाल्यामुळे त्याचा छळ झाला नाही.



गॅलिलिओ (१५६४-१६४२) या सुप्रसिद्ध शास्त्रज्ञाने १६१० साली दुर्बीण बनविली. दुर्बिणीतून ग्रह-ताऱ्यांचे निरीक्षण करणारा तो पहिला शास्त्रज्ञ. कोपर्निकसचा सिद्धांत बरोबर असल्याचं जेव्हा गॅलिलिओला संशोधनांती पटलं, तेव्हा त्याने पृथ्वी सूर्याभोवती फिरते या सत्याचा पुनरुच्चार केला. धर्मसमजुतीपेक्षा वेगळं मतप्रदर्शीत करण्याच्या गुन्ह्याबद्दल त्यावेळच्या पोपने गॅलिलिओला दोषी ठरवलं. आपला आणि आपल्या कुटुंबीयांचा छळ होऊ नये म्हणून गॅलिलिओने मनाविरुद्ध का होईना, पोपची माफी मागितली. पण तरीही धर्मपीठाचा राग मावळला नाही. गॅलिलिओला नजरकैदेत ठेवण्याचा हुकूम सोडला. त्यावेळी तो ७० वर्षांचा होता.

धर्मपीठाची एकेकाळी इतकी दडपशाही होती की, कोपर्निकस आणि गॅलिलिओ यांचे सिद्धांत अभ्यासक्रमात समाविष्ट करायला बंदी घातली होती. आणि ही बंदी १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत म्हणजे जवळजवळ अडीचशे वर्षे टिकून होती. हे विश्व अमर्याद आहे आणि आपल्या सारखीच दुसरी 'सोलर सिस्टीम' अस्तित्वात आहे, असे (धर्मबाह्य) मत मांडले म्हणून जियोर्डानो ब्रुनो या इटालियन विचारवंत, तत्वज्ञ, असंख्य ग्रंथांच्या लेखकाला तर जिवंत जाळण्यात आलं.

उत्क्रांतिवादाबद्दलची आपली मतं आपण जाहीरपणे व्यक्त केली तर आपण धार्मिक नेत्यांचा रोष ओढवून घेऊ या भीतीपोटी चार्ल्स डार्विनने त्याचा सिद्धांत सुमारे वीस वर्षे जाहीर केला नाही. डार्विनचा उत्क्रांतिवाद शाळा-कॉलेजात शिकवला जाऊ नये म्हणून अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशातही आंदोलने केली गेली, कोर्टात खटले दाखल करण्यात आले.

## विज्ञानवाद


अनिल मुसळे
मोबाईल नं. 9769857412
Email : anilmusale91@gmail.com




वैद्यकीय क्षेत्राने आज बरीच प्रगती केली आहे. पण एकेकाळी शवविच्छेदन करून शरीररचना समजून घेण्याचा आणि विविध आजारांचे मूळ शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्या शास्त्रज्ञांना धार्मिक नेत्यांच्या रोषाला बळी पडावं लागलं. लसीकरणाला देखील सुरवातीच्या काळात खूप विरोध झाला. देवाचा कोप झाल्यामुळे औषधोपचार करून देवाच्या मर्जीविरुद्ध रुग्णाला बरं करणं पाप आहे अशी एकेकाळी लोकांची धारणा होती.

प्रसूतीच्या वेदना जाणवू नयेत म्हणून भूल देण्याच्या डॉक्टरांच्या प्रस्तावाला युरोपमधील धर्मपीठाने प्रखर विरोध केला. कारण इव्हने केलेल्या पापाची शिक्षा म्हणून स्त्रियांना प्रसूतीच्या वेळी वेदना होतात असा धर्मग्रंथात उल्लेख आहे. प्रसूतीच्या वेळी होणाऱ्या वेदना शमविण्यासाठी जेम्स यंग सिम्पसन (१८११-१८७०) या डॉक्टरने १८४७ साली ईथरचा वापर प्रथम केला. त्याने केलेल्या धर्मविरोधी कृत्यामुळे त्यावेळचे धार्मिक नेते त्याच्यावर प्रचंड खवळले आणि त्यांनी त्याला वेगवेगळ्या प्रकारांनी त्रास द्यायला सुरुवात केली. पुढे व्हिक्टोरिया राणीने स्वतःच्या प्रसूतीच्या वेळी वेदनाशामकांचा वापर करण्यास परवानगी दिली. त्यामुळे यासाठी होणारा धार्मिकांचा विरोध नंतरच्या काळात हळूहळू मावळत गेला.

जगातील विविध धर्माच्या अनुयायांनी नेहमी प्रतिगामी भूमिका घेतली, अंधश्रद्धांना खतपाणी घातलं आणि वैज्ञानिकांनी शोधून काढलेल्या सत्याला दडपण्याचा अट्टाहास केला.



**मुख्य संदर्भ :**
**Science A History- 1543-2001, शोधयोग, लेखक, प्रदीप कुलकर्णी. (मॅजेस्टिक प्रकाशन)**


# उगवतीच्या दिशेने तरुणांना योग्य मार्ग दाखविणारे पुस्तक

काही दिवसांपूर्वी गावाला गेलो होतो. तेव्हा गावाच्या बसस्टॉपवर अगदी बारा-तेरा वर्षाची काही पोरं मला पानठेल्यावर खरा खातांना दिसली. समोर गेलो तर त्याच वयाची काही पोरं मोबाईलवर गेम खेळत आणि टवाळक्या करतांना दिसली. नंतर माहित झालं की यांतीलच काहीजण प्रेमात देवदास,मजनू, बाबू झाले आहेत. हे सारं बघून वाईट वाटलं.

एकीकडे ऐन तारुण्यात हि पोर बिघडली आणि दुसरीकडे याच वयातला एक ग्रामीण भागात राहणारा, सर्वसामान्य घराण्यातील, शेतीच्या काळ्या मातीमध्ये वाढलेला, अगदी सोळा वर्षाचा पोरगा लिहू लागला आणि नुसतं लिहू लागला नाही तर वाचकांच्या मेंदूलाही विचार करावा लागेल अश्या उत्तम दर्जाची वैचारिक मेजवानी आपल्या "उगवतीच्या दिशेने" या पुस्तकाच्या माध्यमातून तुमच्या-आमच्या पर्यत पोहचवली. हा तरुण म्हणजे युवा साहित्यिक, माझा मित्र आदित्य रजनी दिनकर आवारी.

आदित्यने उगवतीच्या दिशेने हे पुस्तक जुलै-२०१९ मध्ये मला भेट दिले होते पण खूप उशिरा आणि पहिल्यांदाच एखाद्या पुस्तकांवर व्यक्त होत आहे. अगदी मनोगतामध्ये आदित्य लिहतो की, "उगवतीच्या दिशेने" हे पुस्तक फक्त माझे नसून तळागळात असलेल्या प्रत्येक तरुणांचे आहे. पुढे म्हणतो की, "आयुष्य इतरांसाठी जगावं वेळ मिळाला तर स्वतःकडे पाहावं" या वाक्यातून त्याची




समाजाबद्दल असलेली तळमळ प्रामुख्याने लक्षात येईल.

**"जेवण करतांना आपल्याला**
**आठवत असते फक्त आई**
**पण त्या शिदोरीची सोय**
**बहुदा आपला बापच पाही..."**

प्रत्येक मुलांच्या कच्या आयुष्याला सुंदर आकार,रूप आणि त्याला उत्तम प्रकारे घडविण्याचे काम बाप नावाचा कुंभार करत असतो. पोरांसाठी शिक्षणासाठी वणवण भटकणाऱ्या, पोरांला घडवितांना स्वतः उपाशी राहणाऱ्या याच बापाविषयी पुस्तकाच्या पहिल्या लेखात आदित्य म्हणतो की, माझ्या मुलांना इतरांसमोर हात पसरण्याची वेळ येऊ नये म्हणून बाप कष्ट करतो पण ज्या बापाने मुलांना घडविलं, चांगलं शिक्षण दिलं तेच पोरं आज भांडणे करून बापाच्या अंगावर धावून जातात. तसेच लहानपणी अंगाखांद्यावर खेळलेली पोरं आज बापासोबत बोलतांना सुद्धा दिसत नाही. हि समाजाची व्यस्था आदित्य आपल्या लेखात मांडतो.

**"जगण्याची ओढ मायचं लावी**
**प्रेमाची ममता मायचं दावी**
**बालपणात शिक्षिका होऊन**
**शिकवून जाई सारं काही"**

पुढे "माय" या लेखात आईची महिती सांगताना आदित्य लिहतो की, माय जरी कमी शिकलेली असेल तरीही आपल्या मुलांना माणूसपणाची शिकवण उत्तम प्रकारे देते. बापाच्या खांद्याला खांदा लावून, संसारात आलेल्या कित्येक संकटावर माय मात करून आयुष्य जगते. कृषिप्रधान असलेला भारत आज किक्रेटप्रधान होतो की काय..? हा प्रश्न त्याने "माझ्या शेतकऱ्यांची वास्तविकता" या लेखात मांडला असून पुढे "आत्महत्या" या लेखामध्ये प्रेमप्रकरण,कर्जबाजारीपणा, आजारपण, बेरोजगारी अश्या विविध कारणांतुन आत्महत्या होतात पण निराश न होता जिद्दीने काम करत राहावे, स्वतःवर विश्वास ठेवुन पुढे गेले पाहिजे असे आदित्य म्हणतो.

"प्रेम" या लेखामध्ये आदित्यने प्रेमात आयुष्याचं वाटोळं करणाऱ्या तरुणांना उद्देशून लिहतो की, एखाद्याने तुम्हाला नकार दिला तर तो नकार पचविण्याची क्षमता ठेवा. इतरांवर प्रेम करण्याआधी स्वतःवर प्रेम करून बघा. लेखाच्या शेवटी आयुष्यात एखादी कायमस्वरूपी प्रेयसी असावी अशी इच्छा आदित्य व्यक्त करतो. कोणतीही व्यक्ती चांगली असो अथवा वाईट हे त्या व्यक्तीवर झालेल्या संस्कारामुळे घडत असते. त्यामुळे आपल्या मुलांवर कसे संस्कार करावयाचे हे प्रत्येक आईवडिलावर अवलंबून आहे आणि स्वतः लहानपणापासून आदित्यवर त्याच्या आईबाबाने कसे चांगले संस्कार केलं यांचे वर्णन "संस्कार" या लेखामधून आदित्य करतो. भ्रष्टाचार थांबविण्यासाठी "मी भ्रष्टाचार करणार नाही आणि कुणालाही करू देणार नाही" अशी प्रत्येकांनी प्रतिज्ञा घेऊन देशाची प्रगती करून देश सुजलाम-सुफलाम करावे असे आवाहन "भ्रष्टाचार" या लेखातून आदित्यने केले आहे. प्रत्येकाला हवेहवे वाटतात ते म्हणजे आपले आजी-आजोबा. अगदी लहानपणापासुन नातवंडाना घडविण्याचे काम आजी-आजोबा करीत असतात. आपल्या आजीबद्दल आदित्यने जुन्या आठवणी "माझ्या आजीचे झाड" या लेखात सांगितल्या असून आजीच्या अकाली निधनानंतर तिची आठवण म्हणून ग्रामपंचायतच्या जागेवर आदित्यने एक वडाचे झाड लावले. यावरून तो आपल्या आजीवर आणि निसर्गावर किती प्रेम करतो याची प्रचिती येईल.

आपल्याला जीवनात यशस्वी व्यक्ती व्हायचे असेल तर पुस्तके वाचून ज्ञानात भर टाकणे गरजेचे आहे. असे आदित्य आपल्या "पुस्तक" या लेखामध्ये म्हणतो. पुढे "भावंड" या लेखामध्ये आपल्या बालपनाविषयीच्या आठवणी सांगून आज समाजामध्ये भावंडात नात्याची कशी दरी निर्माण झाली आहे याची सुंदर मांडणी आदित्य करतो. "आमच्या देशात डिग्री असुनही नोकरी मिळत नाही, तसेच नोकरी मिळत नाही म्हणून शांत बसल्याने नोकरी मिळणार नाही" त्यासाठी आजच्या तरूणाने आपल्या हक्कासाठी रडलं नाही तर लढलं पाहिजे. असे आवाहन "आजचा तरुण" या लेखांमध्ये आदित्य करतो. हृदय, बालपण, आयुष्य, देश, मन, व्यसन, आदर्श, आठवण, इच्छा, मन, हुंडा, विचार, मैत्री, भेट, कुटुंब, विश्व, जंगल, पाणी, निसर्ग आणि बेरोजगारी अश्या एकंदरीत एकूण ३१ लेख एकत्र करून "उगवतीच्या दिशेने" या पुस्तकाला आदित्यने जन्म दिला आहे. पुस्तकातील प्रत्येक लेख विचार करायला लावणारे असून वाचकांना हे पुस्तक वाचतांना नक्कीच आनंद होईल. हि आशा व्यक्त करतो. तसेच आदित्यच्या लिखाणाला वाचकांपर्यत पोहचविण्यात ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या मदत केली त्या सर्वांचे धन्यवाद आणि उगवतीच्या दिशेने हे पुस्तक मला भेट दिल्याबद्दल आदित्यचे आभार मानून...थांबतोय !

**- सुरज पी. दहागावकर, चंद्रपूर.**
**8698615848**

# कार्ल्याची एकविरा देवी



एकवीरा आईचे मंदिर हे महाराष्ट्रातील लोणावळा या गावाजवळ कार्ला या लेण्यांजवळ आहे. कार्ला निवासिनी शक्तिदायिनी श्री एकविरा देवी आई महाराष्ट्राची आराध्य कुलदेवता, हाकेला धावणारी, नवसाला पावणारी आई एकविरा देवी म्हणजेच आदिमाता रेणुका. परशुरामाची माता.

जगप्रसिद्ध कार्ला लेणीच्या तोंडाशी असणारे एकविरा देवीचे मंदिर म्हणजे कोळी बांधवांबरोबरच तमाम महाराष्ट्राचे श्रद्धास्थान. या देवीची मूर्ती ही स्वयंभू असून हे देवस्थान पांडवकालीन असल्याचे मानले जाते. आई एकविरेचे स्थान कार्ला गडावर स्वयंभू असून अतिशय प्राचीन आहे. आईची मूर्ती स्वयंभू तांदळा दगडात प्रगटलेली "शेंदूर चर्चीत" आहे. लेण्यांमध्ये असलेले तिचे स्थान हे मंदिराचे वेगळेपण, प्राचीनता आणि तिचे लोभस रूप यामुळे या देवीचा महत्व काही वेगळेच आहे.

आपण मंदिरात प्रवेश केल्यावर प्रथम आपल्या नजरेस पडतो आईचा चांदीचा नक्षीदार गाभारा. ते नयनरम्य नक्षी काम पाहून मन मोहून तर जातेच पण आईचे लोभस रूप पाहून आपण आपलेच राहत नाही. ते लोभस तेजस्वी रूप डोळ्यात साठवत डोळ्यातून अश्रू कधी वाहू लागतात ते समजतही नाही. तेजस्वी नेत्र असलेल्या या देवीच्या मुखमंडलावरील हास्य व ते प्रसन्न रुप पाहून मन अगदी उल्हासित होतं. मनात नवीन चैतन्यं निर्माण होतं.

शारदीय नवरात्रोत्सवाची सुरुवात होताच वातावरणात एक वेगळीच उर्जा सामावल्याची अनुभूती होते. एका अद्वितीय शक्तीचा जागर या नऊ दिवसांमध्ये केला जातो. नवरात्रीच्या नऊ दिवसात एकविरा मातेच्या दर्शनासाठी रोज हजारो भाविक दर्शन घेण्यासाठी व देवीचा नवस फेडण्यासाठी येतात.

**॥ एकविरा आई तू डोंगरावरी**
**नजर हाय तुझी कोल्यांवरी ॥**

असे म्हणत आराध्य दैवत असलेल्या आणि नवसाला पावणारी म्हणून कोळी समाजात एकविरा देवीचं स्थान पूज्यनीय आहे. नवसाला पावणारी कोळी बांधवांचे आराध्य दैवत असणारी देवी. देवळाच्या भोवती निसर्ग सिध्दहस्ताने वंदन करत आहे. कोळी आणि आगरी समाजाची कुलदेवता म्हणून देवीची महती असली तरी सर्वच भाविकांची ती स्फूर्तीदेवता आहे.

डोंगरातलं स्थान, प्रसन्न रूप, जागरूक देवस्थान आणि नवसाला पावणारी देवी म्हणून महत्व असलेल्या या देवीचं लोभसवाणं रूप प्रत्येक भक्ताने एकदा तरी डोळ्यात साठवून घ्यायलाच हवे. नव्या उमेदीने जगण्यासाठी आई एकविरेचे दर्शन व परिसरातील निसर्गतील सौंदर्याने आपले मन प्रफुल्लित होऊन जाते हे मात्रं निश्चितचं.

**- संगीता कुलकर्णी, ठाणे**
**9870451020**

# प्रशंसा

प्रशंसा हा शब्द लहान असला तरी त्यात खूप मोठा अर्थ सामावलेला आहे. प्रशंसा ही एक भावना आहे, संवेदना आहे. या भावनेला इंग्रजीत प्रतिशब्द आहे कॉम्प्लिमेंट्स तसेच हिंदीत तारीफ. मराठीत तर भरपूर प्रतिशब्द आहेत जसे की वाखाणणी, स्तुती, नावाजणी, कौतुक इत्यादी. पण प्रत्येकाला हवीहवीशी वाटणारी भावना तसेच सुखावणारी ही संवेदना आहे हे नक्की. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यातील प्रेरणादायी गोष्ट असेल तर ती प्रशंसा. मानसिक उभारीसाठी प्रशंसा फार मोठे काम करीत असते. प्रशंसा ही भावनिक आस आहे असे म्हटले तर ते जास्त संयुक्तिक ठरेल. प्रशंसा करणाऱ्या व्यक्तीच्या सुसंस्कृतपणाचे दर्शन या कौतुकमिश्रित शब्दांतून अधोरेखित होते. त्याचबरोबर मनापासून कौतुक करणाऱ्या व्यक्तीच्या विचारधारेचे तसेच प्रगल्भतेचे दर्शन होत असते.

बौध्दिक गरजा, मानसिक गरजा, सामाजिक गरजा इत्यादी गरजांबरोबरच आणखी एक गरज म्हणजे प्रशंसा. माणसाला सुसंस्कृतपणे जगण्यासाठी प्रशंसेची आवश्यकता असते. आपण कोणाला तरी आवडतो / आवडते ही जाणीवच मनाबरोबरच शरीरालाही सकारात्मक ऊर्जा द्यावयाचे काम करते. कौतुक, वाखाणणी, स्तुती, गुणगान, इत्यादी सारख्या समानार्थी शब्दांनी या भावनेचे वर्णन करता येईल.

आपल्याबद्दल कोणी चांगले बोलत आहे ही भावनाच मनाला सुखावह आहे. कोणीतरी आपली दखल घेत आहे ही संवेदना मनाला उभारी देणारी आहे. आपण पण कोणीतरी आहोत हा विचारही मनाला एक प्रकारची धुंदी देतो. मनापासून केलेली प्रशंसा दोघांनाही सारखाच आनंद देतात. आपली प्रशंसा ऐकण्यात आपल्याला जेव्हढा आनंद मिळतो तेव्हढाच किंबहुना थोडा जास्तच आनंद आपण समोरच्याची प्रशंसा मनमोकळे करून आपल्यालाच मिळतो. ज्याप्रमाणे प्रशंसा करणारी व्यक्ती मनमोकळे व निस्वार्थी मनाने प्रशंसा करीत असेल तर त्या प्रशंसेचा स्वीकार करणारी व्यक्ती तेव्हढीच मोकळ्या मनाची असेल तसेच परिपक्व असेल तर त्या कौतुकाचा स्वीकार मोठ्या विनयाने केला जातो. जेव्हा आपण कोणाची प्रशंसा करतो तेव्हा आपण आपल्याच विचारातून बाहेर पडून दुसऱ्या कोणाचा तरी विचार करतो ही संवेदनाच मनाला उल्हसित करणारी आहे व त्याचबरोबर आपला आत्मसन्मानही नकळतपणे वाढतो. कोणी कामाची स्तुती केली तर त्याचा विनम्रपणे स्वीकार करावयाच्या ऐवजी 'त्यात काय एव्हढे हे मी नेहमीच करतो' असे बेफिकिरीने बोलल्यामुळे आपल्या मनात विचार येतो की मी उगाच स्तुती केली त्याचबरोबर ज्याची स्तुती केली तो अपरिपक्व ठरतो. ती व्यक्ती कामात हुशार असेल पण दुसऱ्याच्या भावना ओळखता येत नसतील तर त्या हुशारीचा उपयोग काय ?. कोणीही केलेल्या स्तुतीचा आदर तसेच स्वीकार करणे हेच परिपक्वतेचे लक्षण आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. प्रशंसा करण्याच्या बाबतीत अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे नेमकेपणा. ज्या व्यक्तीची प्रशंसा करायची त्या व्यक्तीला केंद्रस्थानी मानून फक्त त्या व्यक्तीच्या संबंधित नेमके गुण प्रकाशात आणून त्यावर बोलणे. प्रशंसा करण्यात नेमकेपणा असेल तर त्यात प्रशंसा करणाऱ्याची प्रगल्भता डोकावीत असते. त्याचबरोबर हेही महत्त्वाचे आहे की प्रशंसा करतांना वेळेचे भान असणे तेव्हढेच गरजेचे असते. नातलगांपैकी / परिचितांपैकी कोणीही काही बाबतीत यश मिळविले हे समजल्यावर दोन चार दिवसात फोन करून अथवा प्रत्यक्ष भेटून अभिनंदन करून यशप्राप्तीची प्रशंसा केली तर त्या प्रशंसेत आपलेपणा जाणवितो. पण तीच प्रशंसा काही महिन्यांनी केली तर त्याला यांत्रिकतेचे रूप येते. त्याच्या यशाचा आनंद ताजा असतानाच त्याच्या / तिच्या यशाची प्रशंसा केली तर तो आनंद द्विगुणित तर होतोच पण त्याचबरोबर अभिनंदन करणाऱ्या व्यक्तीच्या परिपक्व जाणिवांचे दर्शन होऊन आदरही दुणावतो. त्याला / तिला झालेला आनंद अभिनंदन करणाऱ्यालाही / करणारीलाही आनंदित करून जातो तसेच उल्हसितही करून जातो.

शेवटी एव्हढेच सांगता येईल की प्रशंसा, स्तुती, वाखाणणी, नावाजणी, शाबासकी इत्यादी भावना प्रत्येक माणसाला हव्याशा वाटतात. कोणाला तरी आपण आवडतो तसेच कोणीतरी आपली दखल घेतो ही भावनाही स्वउन्नतीला प्रेरणादायी ठरते. आपली सोबत कोणाला तरी आवडते ही गोष्ट माणसाला भुरळ पाडणारी आहे. ही भावनाच माणसाला अंतर्बाह्य उत्तेजित करून जाते. प्रत्येक माणूस खऱ्याखुऱ्या प्रशंसेचा भुकेला असतो हे नक्की.

**- मिलिंद कल्याणकर, नवी मुंबई**

## वास्तुवैभव



रमेश नाईक
9819066397


# गृहकलह आणि वास्तुदोष


घरोघरी मातीच्याच चुली किंवा कुठेही गेले तरी पळसाला पाने तीनच. अशा म्हणी घराघरातील आपसी भांडण्याच्या बाबतीत सुरवातीपासून आतापर्यंतच्या सर्वच घरांना लागू पडतात. घर म्हणजे चार माणसे एकत्र राहणार म्हणजे थोडेफार मतभेद हे असायचेच. मात्र काही घरांच्या बाबतीत हे मतभेद मोठ्या कलहांना आणि त्यांच्या गंभीर परिणामांना कारणीभूत ठरतात. अशा आपसी वादविवादांसाठी घरातील इतर परिस्थिती तसेच संस्कारांबरोबरच बऱ्याच वेळा वास्तुदोषही कारणीभूत असू शकतात. अशाच काही कॉमन भांडणाचे प्रकार आणि त्यांस जबाबदार असू शकणारे वास्तुदोष खाली देत आहे.

१. पती पत्नीमधील नाते ही संपूर्ण घरास घरपण देणाऱ्या गोष्टींमधील प्रमुख गोष्ट आहे. हे समजत असूनही बऱ्याच वेळा दोघात वादविवाद घडतातच. यासाठी बऱ्याच वेळा अहंकार (इगो), हट्टीपणा, स्वतःचा मोठेपणा कायम ठेवण्याचा प्रयत्न अशी अनेक कारणे असतात. पती पत्नीमधील भांडणाचा प्रकार सर्वसामान्य (कॉमन) जरी असला तरी अशा भांडणाकडे वेळीच लक्ष न दिल्यास त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावे लागतात.

अशा प्रकारच्या पती पत्नीमधील वादास घरातील आग्नेय दिशेतले वास्तूदोष प्रामुख्याने कारणीभूत असतात. पहिला दोष म्हणजे किचन आग्नेयेत नसुन इतरत्र असणे, नैऋत्य, पश्चिम वायव्य किंवा उत्तर या दिशेत किचन असल्यास पती पत्नी वाद वाढतो. तसेच आग्नेय कट असण्यानेही असे प्रकार घरात वारंवार घडण्याची शक्यता असते. आग्नेयेत पाण्याची टाकी, टॉयलेट, बाथरूम किंवा बेडरूम असल्यानेही अशी भांडणे वाढण्याची शक्यता वाढते. आग्नेयेतील वास्तुदोषांप्रमाणेच वायव्य आणि ब्रह्मस्थळातील दोषही अशा भांडणांना अशा भांडणांना महत्वाचे कारणीभूत दोष मानले जातात. वायव्य ही सुसंवादाची दिशा आहे. या दिशेतील वास्तुदोष म्हणजे या दिशेत कट असणे. किचन किंवा मास्टर्स बेडरूम असणे अशामुळे सुसंवादात बाधा येते आणि कलह वाढतात. ब्रह्मस्थळ हे संपूर्ण घराच्या शुभाशुभ ऊर्जेचे शुद्धीकरण मानले जाते. इथूनच ऊर्जेचे शुद्धीकरण होऊन शुद्ध शुभ उर्जा घरात फिरवली जाते. म्हणूनच ब्रह्मस्थळाला घराचे हृदय संबोधले जाते. अशा या महत्त्वाच्या भागात जर कॉलम,जीना किंवा इतर काही जडत्व, अडथळे असल्यास तो मोठा वास्तुदोष मानला जातो. जेणेकरून ऊर्जेचे शुद्धीकरण न झाल्यामुळे त्या वास्तूत आपसी कलह वाढू शकतात.

२. वृद्ध आई वडिलांशी मुलांची सतत भांडणे होणे, भांडणाचा हा प्रकार विशेष करून मोठ्या किंवा एकत्र कुटुंबात जास्त जाणवणारा आहे. अशा घरात नैऋत्य, दक्षिण, वायव्य तसेच ब्रह्मस्थळातील दोष तपासून पहावे. ईशान्येत किचन असल्यास पिता पुत्रांमधील भांडणास आणखी जोर येतो. पित्याप्रमाणे पत्नीशीही सुसंवाद बिघडतो. अशा कुटुंबातील वृद्ध माता पित्यांनी ईशान्येकडील आणि मुलाने पत्नीसह नैऋत्येची बेडरूम वापरावी. अशा घरात वायव्येतील इतर दोषही बारकाईने तपासावे आणि ते त्वरित दूर करावेत. दक्षिणेचा अती प्रवाहीपणा किंवा हलकेपणा सुद्धा अशा कलहाचा कारक ठरू शकतो.

३. सासू सुनेतील भांडणे. भांडणाच्या या प्रकाराला वास्तुदोषांइतकेच संस्कार, असमजूतदारपणा तसेच अहंकार (इगो) हेही दोष कारणीभूत असतात. तरीसूद्धा केवळ वास्तुदोषांचाच विचार केल्यास सासू सूनांच्या भांडणास प्रामुख्याने वायव्येचे किचन जास्त कारणीभूत असते. अर्थात वायव्येतील कोणतेही दोष घरातला आपसी सुसंवाद बिघडवतातच परंतु किचनमुळे (अग्नीमुळे) वायव्येच्या वायू तत्वामुळे कलहाच्या अग्नीचा भडका जास्त उडतो.



भांडणे कोणत्याही प्रकारची असोत परंतु प्रत्येक भांडण गृहकलह निर्माण करून गृहसौख्यात बाधा आणतेच आणते. भांडणातुन नाते बिघडते. आपसातला प्रेम जिव्हाळा आटतो. आणि जिथे प्रेम जिव्हाळा नाही त्या वास्तुला घर म्हणताच येत नाही. अशा भांडणांना वास्तुदोष जितके कारणीभूत असतात तितकेच आपण स्वतः सुद्धा जबाबदार असतो हे पक्के मनात असू द्यावे. भांडणाची ठिणगीच जर विझवली तर पुढील भडका आपण सहज टाळू शकतो म्हणून अशा प्रसंगी वास्तुदोषांवरच्या उपायांबरोबर स्वतःच्या मनाचा ठाव घेत रहाणे हा सुद्धा तितकाच महत्त्वाचा उपाय ठरू शकतो.

आणखी काही वाद विवाद कलहांचे प्रकार आणि त्यांस कारणीभूत असणारे वास्तुदोष पाहूया पुढील लेखात.

# व्यवहार, मानापमान, काल, आज आणि उद्या... (पूर्वार्ध)



साधारण तीस एक वर्षांपूर्वी लग्न सोहळा खूपच वेगळा असायचा. तो ज्यांनी कोणी अनुभवला आहे त्यांना मला नेमके काय म्हणायचे आहे ते लक्षात येईल. हल्लीच्या काळात लग्न हा प्रकार दोन तीन परस्परविरोधी पद्धतीने होताना दिसतात. एक तर पळून जाऊन, कोर्टात, मंदिरात असे किंवा घरी साधेपणाने लग्न करून मग ओळखीच्या लोकांकरिता रिसेप्शन असे. आणि हे पर्याय सोडून थेट दुसरे टोक असते. इतके भव्य दिव्य आणि थाटामाटात लग्न करतात की सामान्य माणूस विचार देखील करू शकत नाही.

साध्या लग्नाच्या एका पत्रिकेची किंमत काय असावी? तुम्ही - आम्ही काय अंदाज लाऊ शकतो एका पत्रिकेच्या किमतीचा. एका ओळखीच्या कुटुंबातील विवाह सोहोळ्यासाठी चक्क पाच हजार रुपयांची एक याप्रमाणे पत्रिका छापण्यात आल्या होत्या. त्यांनी डेस्टिनेशन वेडिंग ठरवले होते. हा एक नवीनच प्रकार हल्ली बघायला मिळतो. यात प्री वेडिंग, पोस्ट वेडिंग असे नविनच आणि बरेच खर्चिक सोपस्कार असतात. पण इतके सगळे करून देखील एखाद्या लग्नाचा ह्या सोहळ्याचा जो आनंद, अनुभव मंगल कार्यालयात सर्व नातेवाईकांच्या सोबत येत होता, तो कुठेतरी आपण गमावून बसलो आहोत हे नक्की.

माझ्या आठवणीत जो आनंद त्याकाळी लग्नात असायचा तो या श्रीमंती थाटात कुठेच दिसत नाही. आधीच्या लग्नांमध्ये आपुलकीचा ओलावा होता, आता मात्र निव्वळ कोरडेपणा असल्याचे जाणवते. तेव्हा नातेवाईकांना महत्त्व असायचे ते महिना महिना आधीपासून स्वतः एकत्र येऊन लग्नाची तयारी करायचे. आता मात्र सर्वच कामे कंत्राटी पद्धतीने दिली जातात. आणि नातेवाईकांपेक्षा इतर मित्रपरिवारांना अधिक महत्व आले आहे. नातेवाईक अगदी वेळेवर येऊन निघून जाताना दिसतात. आग्रह करणे, पंगती वाढणे अशा कितीतरी गोष्टी आता कालबाह्य झालेल्या आहेत. हा बदल अचानक झाला असे नाही पण वेगाने झाला हे मात्र खरं. आता साधारणपणे चाळिशीला असलेल्या बहुतेक जणांनी हे अनुभवले असेल. ह्या पद्धती, हे बदल यातील बऱ्याच गोष्टी लक्षात येण्यापूर्वी झपाट्याने बदलल्या.

मला अजूनही काही प्रसंग आठवतात. आमच्या गावी राजेश्वर मंदिर प्रसिद्ध आहे. त्या मंदिर परिसरातच त्यांची दोन कार्यालये आहेत. आता आहेत की नाही कल्पना नाही. त्या कार्यालयांची रचना मंदिरा प्रमाणेच होती. इथे एका लग्नानिमित्त आम्ही तीन दिवस राहिलो होतो. खूपच धम्माल आणि वेगळाच अनुभव होता तो. जवळपास सर्वच नातेवाईक, काका, मावशी, मामा अशी वरीष्ठ मंडळी आणि आम्ही बाकी सर्व भावंडे असे सर्व त्या कार्यालयात एकत्र होतो. सकाळी सकाळी पुरुष मंडळी बाहेर जाऊन दूध घेऊन यायची. मग कार्यालयातून मिळालेल्या भांड्यामध्ये कार्यालयातीलच शेगडीवर मस्त चहा तयार होत असे. पूर्वी भांडी, शेगडी, गाद्या असे साहित्य कार्यालयातून मोजून मिळत असे. सोबतीला काही मदतनीस देखील मिळायचे. मग पोत्यांमध्ये लेबल लावून भरलेले धान्य व पदार्थ पुरुष मंडळी महिलांना काढून देत असत. मग सर्व बायका मिळून सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण असा सगळा बेत आखत असत. सोबतीला कार्यालयातील मदतनीस असले तरी मेनू, प्रमाण हे सर्व नियंत्रण घरातील महिलांचेच असायचे.



वर्तुळ


किरण आचार्य
72194 20001


जवळपास तीन दिवस लग्नाचे कार्यक्रम सुरू असायचे. यात दुसऱ्या दिवशी नवरदेवा कडील वरात येत असे. मग तर अजूनच धमाल येत असे. लहान मुलांना दिवसभर भूक लागली की खाणे आणि मग निव्वळ दंगा करत खेळणे एवढाच उद्योग असायचा. आजही काही प्रसंग आठवतात. याच राजेश्वर मंदिरातील कार्यालयात एक गच्चीवर जाणारा जिना होता. त्याच्या खाली याच मंदिरातील बिछायत केंद्रातील गाद्या ठेवलेल्या होत्या. आम्ही त्या जिन्यावर चढून एकेक पायरीवरून, खाली ठेवलेल्या गाद्यांवर उड्या मारत असू. जो पर्यंत कोणी मोठी व्यक्ति आम्हाला बघत नाही तो पर्यंत हा उड्यांचा खेळ सुरू राहत असे. मग कुणी बघितले की ओरडा किंवा धपाटा ठरलेला. मग थोडा वेळ इकडे तिकडे पळून, लपून पुन्हा आम्ही आशाच कोणत्यातरी उद्योगाला लागत असू. तेव्हाची वरीष्ठ मंडळी लहान मुलांना ज्या अधिकाराने, प्रेमाने ओरडत होती, रागवत होती ते ही आता दुर्मिळ झाले आहे. तेव्हा मुले कुणाची आहेत याने फरक पडत नव्हता. मुले चुकताना दिसली की सरळ तोंडाचा पट्टा आणि हात दोन्ही चालायचे. आता मात्र मुलांना साधे बोलणे देखील कठिण झाले आहे. लहान मुलांना आणि पालकांना दोघांनाही कोणतीही सूचना आता सहन होत नाही.

पूर्वी लग्नात फोटो काढले जायचे, जे अगदी नैसर्गिक असायचे, ज्या विधी सुरू आहेत त्याप्रमाणे ते काढले जात. आजही असे जुने अल्बम बघितले की ते प्रसंग जसेच्या तसे डोळ्यांपुढे उभे राहतात. प्रत्येक फोटो जिवंत वाटतो. मोठ्या माणसांच्या मध्ये आपणही फोटोत दिसावेत म्हणून आम्ही लहान मुले त्या वेळी फोटोग्राफर च्या मागे पुढे रेंगाळायचो, कितीतरी फोटोत ही धडपड आजही दिसते. आता मात्र हे फोटो देखील आजकाल कृत्रिम झाले आहेत. फोटो आणि व्हीडीओ दोन्ही अगदी सिनेमा प्रमाणे स्क्रिप्टेड असतात. काही ठिकाणी गाण्यांच्या थीम सुद्धा मी बघितल्या आहेत. वर वर मी या प्रकाराचे कौतुक करतो पण मनात खोलवर कुठेतरी हे सर्व मला कृत्रिम वाटते. ते गाणे, त्या पोज, आणि ते ठरवुन टिपलेले भाव देखील कृत्रिम.

लग्न आणि मानापमान नाट्य यांचे एक वेगळेच नाते आहे. याच्याशी संबंधित काही प्रसंग आठवतात, ज्यात काही वेगळीच वर्तुळे उघडताना दिसतील. कालानुरूप इतर बदल झाले परंतू नातेवाईकां मधील मानापमान आणि व्यवहार काही बदलाला नाही. तो कालही होता, आजही आहे आणि पुढेही राहणार.

# गणिताच्या गमती जमती

## पाच अंकी संख्यांचा वर्ग काढण्याची अनोखी पद्धत

आपल्याला मोठ्या संख्याचा वर्ग काढायचा असेल तर आपण केल्क्यूलेटर चा वापर करतो. परंतु मोठ्या संख्यांचा वर्ग काढायचा असेल तर, त्या संख्येला त्याच संख्यने गुणण्यासाठी मोठी आकडेमोड करावी लागते ती कठीण आहे, आणि ते कामही खूप वेळ खाऊ आहे. परंतु हेच काम मनोरंजन पद्धतीने केले तर खूप मजा येते. आणि हेच काम केल्क्यूलेटर च्या सहाय्याने करताना खूप अडचण निर्माण होते. कारण त्याला काही मर्यादा असतात. मॅरिस एल मिलिक या फ्रेंच गणितज्ञाने सन 1936 साली यांनी या अनोख्या पद्धतीचा शोध लावला. त्यात एक अट आहे, जर गुणाकार एक अंकात येत असेल तर तो दोन अंकात लिहा. उदा. 2 x3 = 6 असे उत्तर येते पण ते लिहिताना 06 असे लिहावे.

उदा. $(34252)^2$ = ?

| | | |
|---|---|---|
| यात बाजु बाजुच्या अंकांचा गुणाकार करा. | 1) | 3 x4=12, 4 x2=08, 2 x5=10, 5 x2=10<br>उत्तर 12081010 असे लिहा. |
| एक अंक सोडून अंकाचा गुणाकार करा. | 2) | 3 x2=06, 4 x5=20, 2 x2=04<br>उत्तर 062004 असे लिहा . |
| दोन अंक सोडून अंकाचा गुणाकार करा. | 3) | 3 x5=15, 4 x2=08<br>उत्तर 1508 असे लिहा. |
| तीन अंक सोडून अंकांचा गुणाकार करा. | 4) | 3 x2= 06 |
| 1, 2, 3, 4,ची विशिष्ट पद्धतीचे बेरीज करा. (या पद्धतीने) | 5) | 12081010<br>062004<br>1508<br>06<br>12857850 |
| आलेल्या उत्तराची पुन्हा लिहून बेरीज करा. | 6) | 12857850<br>+12857850<br>25715700 |
| $(34252)^2$ या मूळ अंकांचा वर्ग करा. | 7) | 09 16 04 25 04 (0916042504) |
| 6 व 7 ची बेरीज करा विशिष्ट पद्धतीने | 8) | 25715700<br>+ 0916042504<br>1173199504 |
| उत्तर हे येईल, आहे ना गम्मत | 9) | $(34252)^2$ = 1173199504 |

## जगाच्या गणितामध्ये भारत देश आजोबा आहे

भारतीय वैदिक वाङ्मय हे सार्या जगातील सर्वात जुने वाङ्मय आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, सामवेद हे प्रमुख चार वेद आहेत. ऋग्वेद हा जगाचा आद्यग्रंथ आहे. हे चार वेद साधारणतः पाच सहस्त्र वर्षांपूर्वी लिहिले असावेत. त्यात चार ब्राम्हणे, चार आरण्यके, प्रमुख अठरा उपनिषदे, सहा वेदांगे, सूत्र आणि श्रौत वाङ्मय आणि अठरा पुराणे एवढा त्यात समावेश आहे. त्या आधारे शुल्व सूत्र हा भूमितीचा आद्य ग्रंथ तयार केला गेला असावा. विविध प्रकारच्या यज्ञ वेदींसाठी आवश्यक असलेल्या भूमितींचे शुल्वसूत्रात विश्लेषण केले आहे. आता जरी इतर देशांनी गणितात प्रगती केली असली तरी मूळ गणित हे भारतीयांचेच आहे. जरी ते आता गणितात बाप असले तरी आपण आजोबा आहोत.

एका आकृतीचे दुसर्यास आकृतीत रूपांतर करावे. याचे मार्गदर्शन शुल्वसूत्रात आहे. चला पाहू त्यांची गम्मत.

- चौरसाचे आयतात रूपांतर :- जर चौरसाची बाजू a असेल तर त्याचे आयतात रूपांतर केल्यास आयताची लांबी = $a\sqrt{2}$ व रुंदी $a\sqrt{2}/2$ येईल हे सूत्र असेल.

उदाहरणार्थ : चौरसाची बाजू 4 सेमी असेल तर त्या पासून आयत तयार केल्यास लांबी व रुंदी किती असेल ?

लांबी = $a\sqrt{2} = 4\sqrt{2}$ सेमी व रुंदी $a\sqrt{2}/2 = 4x\sqrt{2}/2 = 2\sqrt{2}$ असेल

- चौरसाच्या कितीही पट चौरस काढणे : - दिलेल्या चौरसाच्या कितीही पट आकाराचा नविन चौरस काढणे हे शुल्वसूत्रात दिलेले आहे. $\sqrt{\chi}xa$ (a = हे मूळ चौरसाची बाजू, x= किती पट )

उदाहरणार्थ : मूळ चौरसाची बाजू किती 3 सेमी आहे त्याच्या 4 पट चौरसाची बाजू किती येईल ?

| | |
|---|---|
| नविन चौरसाची बाजू = $\sqrt{\chi}xa$ | a = मूळ चौरसाची बाजू |
| $\sqrt{4}x3$ | 4 = पट |
| = 2x 3 = 6 येईल | |


**श्री. प्रधान सुरेश कुळकर्णी ( रा. ज. ठाकूर विद्यामंदिर, लोकमान्यनगर, ठाणे.)**
**मो.क्र. ९३२३०९३९८७.**


# मैत्रीकट्टा ( भाग १७ )

दिवाळी जवळ आल्यामुळे कामं खूप होती. मैत्रिणींनी या वेळेला गप्पा मारायला जवळचं एक राजस्थानी थाळी देणारे उपहारगृह निवडले. जेवता जेवता दोन तास मस्त गप्पा मारणे असा कार्यक्रम ठरला. सगळ्याजणी जमल्या. वंदना तिच्या एनजीओच्या 'मुलांचे संगोपन व पालकांचे मुलांशी नाते' या विषयावरील गटचर्चेला जाऊन आली. ती म्हणाली, "आज खूप छान गटचर्चा झाली. आजकाल मुलांना वाढवताना पालक त्यांचा मित्र बनण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे शिस्त कमी होते का? हल्ली एकच किंवा दोन मुले असतात. त्यांना शेअरिंगची सवय नसते. जशी बागेतली झाडे खत, पाणी घालून वाढवली जातात तसंच हल्ली मुलांचं संगोपन होतं. त्यामुळे विपरीत परिस्थितीच ऊन त्यांना सहन होत नाही."

राधा म्हणाली, "मला वाटतं आई-वडिलांना मुलांवरच्या प्रेमामुळे मुलांना सगळ्या सुख सुविधा मिळाव्यात, त्यांना कुठल्याही अडचणी येऊ नयेत असं वाटतं." सीमा म्हणाली, "खरं आहे राधा. मुलं खूप शिकतात. चांगल्या नोकऱ्या/व्यवसाय करतात. त्यामुळे त्यांना खूप अनुभव मिळतात. त्यांच्या विचारांना खतपाणी मिळतं त्यांचं व्यक्तिमत्व झळाळत. पण घरातल्या अडचणीच्या प्रसंगी ही मुलं आपल्याला आधार देतील असा विश्वास पालकांना का वाटत नाही? माझ्या मैत्रिणीची, मंजुची मुलगी अमेरिकेत नोकरी करत होती. मंजुला डेंग्यू झाला व तिची स्थिती चिंताजनक झाली. तरीही तिच्या मुलीला असंच सांगितलं होत की तू भारतात आलीस तर तुझ्या व्हीसाचा प्रॉब्लेम होईल. म्हणून तू येऊ नकोस. हे बरोबर आहे का?"

नीलिमा म्हणाली, "आई वडिलांनी असं सांगितलं होतं हे खरं ना? नाहीतर मुलगीच यायला नाही म्हणत असेल. आई-वडिलांना वाटतं की आपण संस्कार नीट केले नाहीत. ग्रुहछिद्र लपवण्याकरता आई वडील मुलीच्या वागण्यावर पांघरूण घालत असतील." राधा म्हणाली, "हो. खरं आहे. काही सांगता येत नाही. पण माझ्या एका नातेवाईकाच्या घरची गोष्ट सांगते. आई वडील पुण्याला व मुलगा आयटी कंपनीत बेंगलोरला. वडील स्कूटरवरून जाताना अपघात झाला आणि पायाला फॅक्चर झाले. त्यांनी मुलाला सांगितलंच नाही. मुलाला, दुसऱ्या दिवशी, त्याच्या शेजारच्या मित्रांने फोन करून सांगितले. मग तो घरी आला व त्याने परिस्थिती चांगली हाताळली. आई-वडील मुलांना बाळंतपणात व इतर अडचणीच्या वेळी मदत करत असतात. तसेच त्यांनी मुलांकडून मदत घ्यायला हवी असं मला वाटतं."

नीलिमा म्हणाली,"राधा, मला नाही हे पटत. मला तर वाटत आई वडीलांनी होता होईल तेवढं स्वतःच कराव. मुलांचं शिक्षण, त्यांच्या करिअरची सुरूवात असते. त्यामध्ये शक्यतो बाधा आणू नये. आमच्या शेजारच्या काकू एकट्याच राहत होत्या. त्यांचा मुलगा कॅनडात होता. त्या आजारी पडल्या. त्यांचा मुलगा व त्याचं कुटुंब येऊन भेटून गेलं. त्यांच्यासाठी केअरटेकर ठेवली. इतर सोयी करून तो कॅनडात परत गेला. नंतर काकूंचा आजार



वाढला. मुलाने तिकडची नोकरी सोडली व सगळं आवरून दोन-तीन महिन्यात तो कुटुंबासह आईजवळ परत आला. आणि महिन्याभरातच आई गेली. आईला, शेवटी मुलगा जवळ असल्यामुळे नक्की बरं वाटलं असेल. पण मुलाच्या करिअरच काय हा प्रश्न उरतोच. मला वाटतं पालकांनी मुलाकडून मदतीची अपेक्षा करू नये." वंदना म्हणालीं, "पूर्वी आई-वडिलांचा किती धाक असायचा. मला वाटत आपली शेवटची पिढी जी आई वडिलांच्या धाकात राहिली आणि मुलांच्या कलाने सर्व करणारी आपली पहिली पिढी आहे." नीलिमा म्हणाली, "आता विभक्त कुटुंब पद्धती आहे. पूर्वी एकत्र कुटुंबात भरपूर माणसं घरात असत. त्यामुळे मुलांना घरात संयम, समंजसपणा, भावंडांबरोबरची मजा अशा सगळ्या गोष्टी घरात मिळत. मोठ्यांची आदरयुक्त भीती असे. आताही बहुतांश घरात जेष्ठ आईवडील व सासू-सासऱ्यांची काळजी घेतली जाते." राधा म्हणाली, "पूर्वी नोकरी लागली की दोन-चार वर्षांत मुले घर घेत. त्याने स्थैर्य येत असे. मग लग्न करत. आता नोकरीत स्थैर्य नसतंच. मुलं अधिक प्रगतीसाठी नोकऱ्या बदलतच असतात. त्यासाठी वेगळ्या शहरात, देशातही जातात. त्यामुळे आजकाल कामाच्या ठिकाणाजवळ भाड्याने घर घेण्याची मानसिकता वाढते आहे. त्यामुळे प्रवासाचा वेळही वाचतो. लग्नाचे वयही पुढे पुढे सरकते आहे. लग्न न करता एकटे राहणाऱ्याची संख्या वाढते आहे." सीमा म्हणाली, "हे सर्व खरं असलं तरी एकंदरीत आई-वडील व मुलं यांचा संवाद वाढतो आहे. आई वडील बदलाशी जुळवून घेण्याच्या प्रयत्नात आहेत."

नीलिमा म्हणाली, "आपण वेगळ्याच विषयाच्या चर्चा करतोय. दिवाळीला विसरलात का? पुढच्या आठवड्यातच दिवाळी आहे ना. साफसफाई, रांगोळ्या झाली का तयारी सगळी?" सीमा म्हणाली, "हो ग खरंच. दिवाळी आली जवळ. दिव्यांचा सण. आपला आनंदाचा सण. त्याला कस विसरून चालेल? घरी दिव्याच्या माळा व कंदील गेल्या वर्षीचा आहे. पणत्या पण छान मिळाल्या. आमच्या रोडवर मायलेकी विकायला बसतात. तिथेच त्या वेळ मिळाला की पणत्या रंगवतही असतात. मला दिव्यांच्या माळापेक्षा पणत्यांचा मंद प्रकाश अतिशय आवडतो." नीलिमा म्हणाली, "साफसफाई विषयी मी सोशल मीडियावर एक लेख वाचला. दिवाळीला मनाची साफसफाई करा. कोणाबद्दलही मनात राग, द्वेष व कटुता असेल तर ती काढून टाका. त्यामुळे तुम्हाला चांगलं वाटेल. ताण-तणाव कमी होतील. दोन-तीन दिवस मी सकाळी थोडा वेळ ध्यान करते त्यापूर्वी हा प्रयत्न करते आहे." राधा म्हणाली, "खरंच खुप छान कल्पना आहे. मी सुद्धा हा प्रयत्न करीन. मी फराळ हल्ली घरी करतच नाही. थोडाफार विकत आणते. घरात आम्ही दोघंच असतो. मुलांना आम्ही आमच्या नेहमीच्या दुकानातून फराळ कुरिअर करतो."

गप्पा मारत मैत्रिणींचे जेवण आटोपले. वंदना म्हणाली, "फरसाण पदार्थ मस्तच होते. पात्रा, व्हेज रोल्स मस्त. पण भाज्यांमध्ये तुप जास्त होते आणि गोडही होत्या. मला थोडं झणझणीत आवडत." नीलिमा म्हणाली, "आमच्याकडे साधं आणि सात्विक जेवण असतं. त्यामुळे मला भाज्या आवडल्या."

आज आपण थोड्या वेळ भेटलो. पण तरीही खूप छान वाटलं. पुढच्या वेळेला जास्त वेळ गप्पा करायला जमतं का बघूया, अस म्हणत एकमेकींचा निरोप घेऊन मैत्रिणी घराकडे निघाल्या.





**- संध्या सिनकर.**
**sandhya22218@yahoo.in**


# निलगिरीच्या कुशीतील आल्हाददायी ‘उटकमंड’

उटीची रमणीयता- निलगिरी पर्वतराजीच्या कुशीत वसलेले उटकमंड हे थंड हवेचे ठिकाण देशी व परदेशी पर्यटकांमध्ये अतिशय लोकप्रिय झालेले आहे. निलगिरी पर्वतराजीतील नागमोडी पक्क्या रस्त्यावरून बसने वर जाताना सुमारे अडीच फूट व्यासाची व 200 ते 250 फूट उंचीची, पिवळसर, तांबडी बुंधा असलेली, निळसर-हिरवी लांब व निमुळती होत गेलेली पाने, उतारावर वाढलेली, अगणित निलगिरीची झाडे दिसतात त्यांचा काहीसा उग्र दर्प सर्वांना सुखावतो. फार उंचावरून हा निवळसर पट्टा दिसतो, म्हणून त्यास निलगिरी किंवा [blue mountain] असेही म्हणतात. या प्रदेशात उध्गई, उधगीमंडम, ऊटकमंडम वा उटी असे विविध नावाने ओळखले जाते. निलगिरी पर्वतावरील अत्युच्च स्थान असलेले दोडाबेट्टा हे ठिकाण शहरापासून उंचावर दहा किलोमीटर अंतरावर आहे. समुद्र सपाटीपासून ७५०० फूट उंचीवरील ठिकाण हे ठिकाण बऱ्याचदा धुक्याच्या विळख्यात असते. पण जेव्हा त्यापासून ते मुक्त असते तेव्हा मात्र बऱ्याच लांबचा पल्ला देखील अगदी स्पष्टपणे सहजी दिसतो आणि मग आपण किती उंचीवर आलेलो आहोत याचा आपल्यालाच साक्षात्कार होत जातो.

**उटीचे सर्वंकष महत्व** - उटीला एकूण तीन मार्गाने जाता येते. १] म्हैसूरहुन बंदीपूर मार्गे ते १६० किलोमीटर अंतरावर उटी आहे. संपूर्णपणे बस व घाटाचा मार्ग या बसला सुमारे पार करण्यास चार तास लागता. २] [कोईमतूर] - मेटापालयमहून छोट्या रेल्वे मार्गे उटी फक्त ९० किलोमीटर अंतरावर आहे. ब्रिटिशांनी blue mountain नावाची छोटी रेल्वे सुरु केली. अशीच रेल्वे भारतात पुढील ठिकाणी आजही उपलब्ध आहे १] कालका -सिमला, २] नेरळ-माथेरान, ३] सिलीगुडी –दार्जीलिंग ४] मेटापालयम –उटी इ. पण सर्वत्र बस सेवा समांतर धावत असल्याने प्रवाशांना त्याचा जास्त फायदा होतो. बस लवकर वर चढत असल्याने बसने वर लवकर पोहोचता येते तरीही निदान एक वेळ तरी रेल्वेने जावेच कारण तो आनंद काही वेगळाच असतो. हे तीनही मार्ग तीन वेगवेगळ्या राज्यातील असल्याने राज्यांतर्गत परिसीमा [interstate borders] या नात्याने उटीला बरेच महत्त्व आहे. पालघाट [केरळ सीमा], म्हैसूर [कर्नाटक सीमा] मेटापालयम [तामिळनाडू सीमा].

**प्रवाश्यांच्या नजरेतून** - तिन्ही राज्यांचा येथे सतत व्यवहार-व्यापार असल्याने या भागात जवळ जवळ तीन भाषांचा [मल्ल्याळम, कन्नड, तामिळ] सर्रास वावर व वापर देखील आहे. खाण्यापिण्यात ह्या तीनही राज्यांचे प्रतिनिधित्व प्रकर्षाने जाणवते. म्हैसूरहून बंदीपूरपर्यंत गाडी सखल प्रदेशातून धावते मग मात्र बंदीपूरपासून घनदाट जंगलातून गाडी जाते. बंदीपूरचे अरण्य पाहण्यासारखे आहे. त्यासाठी तेथे वास्तविक मुक्काम करायला हवा. कर्नाटक पर्यटन महामंडळाची येथे रहायची सोय आहे, तेथून जंगल अधिकारी यांच्या परवानगीने जंगल सफरीची ही सोय आहे. भल्या पहाटे सफरीने जंगल वैभव पाहता येते. मध्येच एखादा वाघ, हरणांचा कळप, वा डूलत जाणारा मदोन्मत्त हत्ती आपली हजेरी लावत असतो. नंतर कर्नाटक राज्याची जंगलहद्द संपते. मधुमलईपासून तामिळनाडूची हद्द सुरु होते. सामान्यपणे हत्तींचे जंगलसाठी हे प्रसिध्द आहे. तेथील पायकारा नदीवर धरण पाणी अडवून [pykara dam] धरण बांधले असून त्यावर वीज उत्पादित केली जाते. या जंगलातून जाताना निलगिरीच्या झाडांबरोबर चहाचे मळे प्रचंड प्रमाणात दिसतात. उत्पादनासाठी योग्य वातावरण असल्याने चहा उत्पादन हे मोठ्या व्यवसायाचे साधन बनले आहे. त्याचप्रमाणे निलगिरी व मसाल्याचे पदार्थांसाठी प्रसिद्ध आहे. तसेच अन्य फोटो कंपन्या आहेत. एप्रिल ते जून व सप्टेंबर-ऑक्टोबर या महिन्यात पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात.



**पर्यटन स्थळे** - उटी शहर व बाहेरील स्थळे पाहण्यासाठी छोट्या वाहनांनी सोय होऊ शकते. घाट प्रदेश व अरुंद कच्चा रस्ता असल्याने बऱ्याच ठिकाणी छोटीच वाहने जातात. एका बाजूने उंच कडा तर दुसऱ्या बाजूने खोल दरी असे चित्र बऱ्याचदा दिसते. १] बोट्यानिकल गार्डन - उटीतील ही बाग पाहण्यासारखी आहे. त्यामध्ये अनेक प्रकारच्या फुलांच्या जाती उपलब्ध आहेत. सतत धुकट हवामान, थंडगार हवा, अनेक प्रकारचे गुलाब, डेलिया, सुर्यफुल, कॅक्टस पाहून मन थक्क होते. छोट्या झाडांना वेगवेगळे आकार दिले आहेत. साहजिकच केवळ दोन एकरातील ही बाग फारच आकर्षक आहे. ह्याच बागेत भारताचा नकाशा आकर्षकरीत्या



कोरला आहे. २] उटीमधील सिम्स पार्क नावाची छोटीशी बाग अत्यंत आकर्षक आहे. तेथे देशी-विदेशातील दुर्मिळ झाडे विकसित केली आहेत. देवदार, सागवान इ. झाडांच्या विविध जाती जोपासल्या आहेत. तेथे जगाचा नकाशा बनविला आहे. वाटेत माकडे आपली उपस्थिती दाखवीत असतातच. ३] उटी लेक - हे रमणीय व प्रशस्त सरोवर असून तेथे नौकाविहाराची उत्तम सोय आहे. ४] उटी बाहेरील पुढील स्थळे आहेत, कुन्नूर - १९ की.मी. मेंढीखडक. डॉल्फिन नोज, दोडा बेट्टा, विल्लीन्गडन इ. रमणीय वातावरणातून निलगिरीच्या सुगंधात केलेली भटकंती खरोखरीच उत्तेजक व अविस्मरणीय ठरते ह्यात शंकाच नसते.

**अन्य सुविधा** - जावे कसे? विमानाने व रेल्वेने कोईमतूरपर्यंत व पुढे बसने. बसने कोठूनही उटीला पोहोचता येते. राहण्यासाठी परवडणारी बरीच हॉटेल्स आहेत. बंगलोरहून तीन दिवसाची म्हैसूर-उटी-परत अशी आयोजित सहल उपलब्ध असते. [दोन रात्री वस्ती व तिसऱ्या दिवशी रात्री परत]




रामकृष्ण विनायक अभ्यंकर
२/४६ भक्तियोग सोसायटी, परांजपे नगर, वझिरा नाका, बोरीवली प.
मुंबई ४०००९१.मोबा.


फिरू आनंदे

# परिवहन कर्मचाऱ्यांचे 1 कोटी 85 लाख गेले कुठे ?

## मजदुर युनियनचा आयुक्तांना सवाल

**कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेने 2019-20 या आर्थिक वर्षात परिवहन उपक्रमातील कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात केलेली पतपेढीची सुमारे 1 कोटी 85 लाख रुपयांची रक्कम परिवहन पतपेढीला देण्याची मागणी परिवहन मजदूर युनियनचे अध्यक्ष अरविंद मोरे यांनी पालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

सन 2019-20 या कालावधीत परिवहन उपक्रमातील कर्मचाऱ्यांच्या पगारातून 1 कोटी 85 लाख रुपये कपात केलेली रक्कम परिवहन उपक्रमाकडून पतपेढी ला अद्यापही मिळालेले नाही. पगारातून कपात केलेली रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या पतपेढीला देण्याची जबाबदारी परिवहन उपक्रमाची असतानाही पगारातून कपात केलेली रक्कम नेमकी कुठे गेली असा सवाल अरविंद मोरे यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केला आहे.

अनेकदा या रक्कमेकरिता पाठपुरावा करूनही पगारातून कपात केलेली रक्कम कर्मचाऱ्यांच्या पतपेढीला दिली गेली नसून यामुळे परिवहन उपक्रमातील पतपेढी सभासद असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

2 कोटी 85 लाख रुपये येत्या आठवड्याभरात पतपेढीत जमा करावा करावी अन्यथा परिवहन मजदूर संघाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा युनियनचे अध्यक्ष अरविंद मोरे यांनी दिला आहे.

# जय भगवान खासगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात खंडेनवमी निमित्त यंत्रपूजन






**ठाणे: विटावा येथील भाविका विद्या प्रसारक मंडळ संचलित जय भगवान खासगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात दरवर्षीप्रमाणे यंदाही खंडेनवमीला यंत्रपूजन समारंभ आयोजित करण्यात आला.**

औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थींनी संपूर्ण कार्यशाळेत स्वच्छता करून सर्व यंत्रसामग्री, हत्यारे, यंत्रांची भित्तिचित्रे, यंत्र वापरण्याकरिता कार्यशाळेतील सुरक्षा सूचनांचे फलक अतिशय सुबक पद्धतीने लावले होते. रांगोळीसुद्धा एक वेगळा संदेश देणारी व औद्योगिक बाबी समजवणारी होती. एक रांगोळी कोविड योद्धांना समर्पित होती तर दुसरी रांगोळी आपल्या घरापर्यंत वीज कशी येते हे सोप्या चित्रमय पद्धतीने समजावले होते.

संस्थेचे संस्थापक तथा अध्यक्ष डॉ. भगवान केणी व संस्थेच्या सचिवाणारी होती. एक रांगोळी कोविड योद्धांना समर्पित होती; तर दुसरी रांगोळी आपल्या घरापर्यंत वीज कशी येते हे सोप्या चित्रमय पद्धतीने समजावले होते. संस्थेचे संस्थापक तथा अध्यक्ष डॉ. भगवान केणी व संस्थेच्या सचिव सौ. देवांगना केणी यांच्या हस्ते यंत्रपूजन पार पडले. संपूर्ण कार्यक्रमात मास्क लावून व योग्य अंतर ठेवून सरकारी आदेशांचे पालन करून थोडक्यात कार्यक्रमाची इतिश्री करण्यात आली.

# जय भगवान विधी महाविद्यालयात विधी साक्षरता उपक्रमांचे आयोजन







**ठाणे: आझादी का अमृतमहोत्सव या सदरांतर्गत राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली विटावा-कळवा येथील जय भगवान विधी महाविद्यालयाने सामान्य नागरिकांमध्ये कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी 10 ऑक्टोबर 2021 रोजी भव्य रॅलीचे आयोजन ऑक्ट्रॉय नाका तसेच कळवा परिसरामध्ये करण्यात आले.**

तृतीय वर्ष विद्यार्थ्यांनी सडक सुरक्षा या विषयावर पथनाट्य सादर करून वाहन कायदे व नियम याबद्दल लोकांमध्ये जनजागृती केली. 8 ऑक्टोबर 2021 रोजी जागतिक मानसिक आरोग्य सप्ताहानिमित्ताने मानसिक स्वास्थ्याविषयी जनजागृती व्हावी यासाठी महाविद्यालयाने "अवेअरनेस प्रोग्रॅम ऑन मेंटल हेल्थ इन इन्क्वल वर्ल्ड" या विषयावर डॉ. अमोल भुसारे, मानसोपचार तज्ञ रिजनल मेंटल हॉस्पिटल, ठाणे यांच्या वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाली. ॲड. भगवान केणी चॅरिटेबल ट्रस्टचे डॉ. भगवान केणी व प्राचार्य डॉ. मिथुन बनसोडे यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रम उत्साहात आणि उत्कृष्टपणे पार पडला.

**हात स्वच्छ धुवा कोरोना टाळा**

ठाणे लेक सिटीचे रोटरॅक्ट क्लब
सादर करीत आहे
फरी फेस्ट
तब्बल दोन वर्षानंतर ठाण्यात श्वान प्रदर्शन सादर होत आहे जे अत्यंत वेगळे आहे.
या प्रदर्शनात श्वान व त्याचे मालक यांच्यासाठी वेगवेगळे खेळ आणि स्पर्धा आयोजित केले आहेत.
श्वान व त्याचे मालक यांच्यासाठी खेळ, फॅशन शो.
आकर्षक बक्षिसे, वेगवेगळे स्टॉल्स,
आणि भरपूर काही.
मग चला भेटूया 31 ऑक्टोबर सकाळी आठ ते बारा.
ठिकाण: Paw 5 Tails, Yeoor, Thane
शुल्क श्वान +1 व्यक्ती = Rs 250/-
श्वान +2 व्यक्ती = Rs 400/-
अधिक माहितीसाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधावा.
स्प्रिती जैन : ७५०६३२२४६०
आयुषा सुर्वे : ९८२०८८८०५२

१० वे पुण्यस्मरण

आमुची प्रेममय आई,
जसे चंदनाचे खोड सर्वांसाठी
झिजण्याचे तिला सदाचेच वेड
ज्ञानदीपचा वटवृक्ष कैसे होऊ आम्ही उतराई
स्मरण तुझ्या ममतेचे तव उपकारा सीमा नाही
ओल्या आठवणींनी आजही कंठ येतो दाटुनी
चालतो आम्ही वाटेवरी दिला तू आदर्श घालुनी



कै. श्रीमती छाया चंद्रकांत देसाई
जन्म: दि.१३/३/१९५६
मृत्यू: दि.२५/१०/२०११
संस्थापिका आणि माजी सेक्रेटरी
समीर ज्ञानप्रसारक विश्वस्त निधी रजि.
संचलित ज्ञानदीप विद्यामंदिर, मुंब्रा, जि. ठाणे
(प्राथमिक/माध्यमिक मराठी माध्यम शाळा)
ज्ञानदीप कॉनव्हेंट स्कूल (इंग्रजी माध्य)
(Pre-Primary/Primary/Secondary School)

ज्येष्ठपुत्र: श्री. सतिश चं. देसाई
अध्यक्ष: ज्ञानदीप विद्यामंदिर, मुंब्रा, जि.ठाणे
(पूर्व प्राथमिक/प्राथमिक/माध्यमिक मराठी शाळा)
President : Dnyandeep Convent School (Eng.Med)
(Pre-Primary/Primary/Secondary School)

कनिष्ठपुत्र: श्री. समीर चं. देसाई
सेक्रेटरी: ज्ञानदीप विद्यामंदिर, मुंब्रा, जि.ठाणे
(पूर्व प्राथमिक/प्राथमिक/माध्यमिक मराठी शाळा)
Secretary: Dnyandeep Convent School (Eng.Med)
(Pre-Primary/Primary/Secondary School)

स्नुषा: सौ. शिवानी सतिश देसाई
उपाध्यक्षा: ज्ञानदीप विद्यामंदीर मुंब्रा
ज्ञानदीप कॉनव्हेंट स्कूल मुंब्रा

स्नुषा: सौ. प्रविणा समीर देसाई
खजिनदार: ज्ञानदीप विद्यामंदीर मुंब्रा
ज्ञानदीप कॉनव्हेंट स्कूल मुंब्रा

नाती-नातू: कु. आदिती देसाई, कु. श्रेया देसाई, कु. श्रृती देसाई, कु. छायांक देसाई कु.समर्थ देसाई
मुख्याध्यापक: श्री. वासुदेव बऱ्हाटे(माध्य. विभाग), मुख्याध्यापिका: सौ. माधवी कदम,(प्राथ. विभाग)
प्रिंसीपल: सौ. पूर्वा गुजर (इंग्रजी माध्यम)
समस्त ज्ञानदीप विद्यामंदिर मुंब्रा व ज्ञानदीप कॉनव्हेंट स्कूल शिक्षकवृंद
व शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी यांचेतर्फे

भावपूर्ण श्रद्धांजली

तुमच्या आत्मास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!